# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव विषय क्रमांक :- ०१

**सभा क्र. ३१** **// तहकूब विशेष स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त //** **दिनांक.१३/०३/२०२०**

अर्थसंकल्प तयार करणेस्तव सादर केलेल्या प्रस्तावाचा अभ्यास करणेकामी दि.११/०२/२०२० मंगळवार रोजी सकाळी ११.०० वाजता तहकुब करण्यांत आलेली विशेष स्थायी समितीची सभा जळगांव शहर महानगरपालिकेत दि. १३/०३/२०२० शुक्रवार रोजी सकाळी ११.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती ॲड.सौ.हाडा शुचिता अतुलसिंह यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

मा. **ॲड.सौ.हाडा शुचिता अतुलसिंह**, सभापती तथा पिठासीन अधिकारी

| | |
|---|---|
| बालाणी भगतराम रावलमल | दारकुंडे नवनाथ विश्वनाथ |
| ढेकळे सदाशिव गणपत | देशमुख प्रतिभा गजानन |
| पोकळे दिलीप बबनराव | काळे रेश्मा कुंदन |
| खडके सुनिल वामनराव | लढढा नितीन बालमुकुंद |
| सनकत चेतन गणेश | बरडे नितीन मनोहर |
| सोनवणे मुकुंदा भागवत | शेख सैईदा युसुफ |

Municipal Corporation of the City of Jalgaon
जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

सदर सभेस श्री.अजित मुठे, मा.उपायुक्त, श्री.मिनीनाथ दंडवते, उपायुक्त, आरोग्य विभाग, श्री.कपील पवार,मुख्यलेखा अधिक्षक, श्री.संतोष वाहुळे,मुख्यलेखा परिक्षक, श्री.सु.अ.पवार,नगररचनाकार, श्री.पवन पाटील,सहा.आयुक्त, श्री.आकाश डोईफोडे,सहा.आयुक्त व श्री.सुनिल गोराणे, नगरसचिव उपस्थित होते.

(वंदेमातरमने सभेला सुरुवात झाली )

**मा.सभापती** :- नगरसचिव यांनी सभेच्या कामकाजाची सुरुवात करावी.

**नगरसचिव** :- आजच्या सभेकरिता सन्मा.सदस्य श्री. कोल्हे प्रविण रामदास व श्री.पाटील राजेंद्र झिपरु यांचा रजेचा अर्ज आलेला असून तो मा.पिठासिन अधिकारी यांनी मंजूर केलेला आहे.

**नगरसचिव:- विषय क्र १)** मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव यांचे कडील पत्र क्र./जशमनपा/लेखा/८२३/२०१९-२०२० दि.०४/०२/२०२० अन्वये मा.आयुक्त सो., यांचेकडुन स्थायी समितीपुढे सादर होणारे सन २०१९-२०२० चे सुधारीत व सन २०२०-२०२१ चे मुळ अंदाजपत्रकासाठी जमा व खर्चाच्या अंदाजाचे विवरण सादर करणेत आले असुन त्या अनुषंगाने अंदाजपत्रकास मान्यता देणे.

**मा.सभापती** :- सन्मा.सभागृह, मा.उपायुक्त श्री.मुठे साहेब, मुलेअ, श्री.पवार साहेब, श्री.वाहुळे साहेब इतर उपायुक्त साहेब, श्री. पवन पाटील साहेब व सन्मा.सदस्य **न कश्चिदपि जानाति किं कस्य श्वो भविष्यति ! अत: श्व: करणीयानि कुर्यादद्यैव बुध्दिमान् !!** अर्थात उद्याच भविष्य कोणालाच माहिती नाही. त्यामुळे काय असते. जी बुध्दमान व चाणक्य व्यक्ती असते ती उद्याचा वेळापत्रक आजच तयार करते. अंदाजपत्रक ही जी संकल्पना आलेली आहे. तर ही यामुळेच आलेली असणार आहे. प्रशासनाने आपल्याकडे त्यांचा अंदाजपत्रक सादर केलेला आहे. स्थायी समिती म्हणुन आपल्याला त्या अंदाजपत्रकात काही बदल सुचवायचे आहे. सद्या मला सांगण्यामध्ये आनंद होत आहे. प्रशासनाने हॉकर्सचा जे शुल्क होत रु.२०/- होत त्यात प्रशासनाने रु.३०/- इतकी वाढ केलेली होती आणि रु.५० केलेल होत. ती वाढ आपण येथे नाकारत आहोत. त्यांच्यावर कोणतीही वाढ आपण करत नाही. प्रशासनाने अंदाजपत्रक सादर करतांना नागरीकांवर कोणतीही करवाढ केलेली नाही. आपण ही कोणतीही करवाढ जळगांव शहरवासीयांवर लादत नाही. त्यानंतर जमा बाजुकडे जाऊ या प्रशासनाच्या ज्या जमा बाजु आहे. मालमत्ता कर, या मालमत्ता करामध्ये प्रशासनाने रु.५३,६७,६,७००/- अशी तरतुद केलेली आहे. प्रत्यक्ष तरतुदीपेक्षा ही तरतुद कमी दिसते. त्याच्या मागची कारणमिमांसा मी आपल्या पुढे मांडु ईच्छिते , सद्यास्थितीत जळगांव शहराचा बांधकाम वाढलेला आहे. प्रत्यक्ष रकमेमध्ये थोडीशी तफावत दिसत आहे. आपण मागे स्थापत्य नावाच्या संस्थेला सर्वेक्षणाच काम दिल होत. ते काम आता पुर्ण झालेल आहे त्यांचा सर्वेक्षण झालेल आहे.अनेक नविन मालमत्ता नोंदविले गेलेले आहे. या सर्वेक्षणामध्ये जी पध्दत होती ती टेक्नीकली खुप करेक्ट पध्दत असल्यामुळे आपल्या मालमत्तांच्या माध्यमातुन उत्पन्नात वाढ होणे अपेक्षित आहे. या सर्वेक्षणात काही जी मालमत्ता आहे त्यांची सुनावणी घ्यायची असणारआहे. तर मला अस वाटत की, सुनावणी झाल्यानंतर बिल अदायगी होणार आहे. या बिल अदायगी नंतर उत्पन्न कमीतकमी २७ कोटींनी वाढणार आहे. त्यामुळे

प्रशासनाने जे रु.५३,२७,६,७००/- उत्पन्न प्रस्तावीत केलेल आहे. त्यामध्ये आपण २७ कोटीची वाढ करुन ते ८० कोटी करणार आहे. त्यानंतर दुसरे ज्या बाजु आपली उत्पन्नात वाढ होऊ शकते जे लक्षात आलेल आहे स्थायी समितीला तो आहे याचा अभ्यास करतांना तो आहे नगररचना विभाग या विभागातील तरतुद ही आयुक्तांनी केलेली आहे ती ९ कोटी ३८ लाख अशी केलेली आहे.मात्र मागची वसुली जर आपण बघीतली तर ती मागील आर्थिक वर्षी १४ कोटी ८० लाख झालेली आहे. आता अर्थातच नगररचना विभागावर सर्व पक्षीयांकडुन ताशेरे ओढले जात असतात. आज आपण नगररचना विभागाला स्थायी समिती म्हणुन उत्पन्न वाढीकरीता काही मार्ग सुचविणार आहोत. प्रशमित संरचना हा त्यातला एक विषय आहे म्हणजे शहरात जे अनियमीतपणे बांधकाम झालेले आहे तर अनियमीतपणे झालेले बांधकाम प्रिमीयम आणि दंड आकारणी करून नियमाने भरून घेवुन आपल्याला नियमीत करून देता येईल.यामुळे आपल्या नगररचना विभागाच्या उत्पन्न वाढीला याचा नक्कीच हातभार लागणार आहे. त्यानंतर अनियमीत गुंठेवारी नियमीती करण व विकास जेणेकरून यासगळया ऐवढे अधिकार या विभागाला आहेत पण त्याच्या हव्या त्यापध्दतीने काम होत नसल्याने तिथलं उत्पन्न आपल्याला कमी येत आहे तर ते उत्पन्न आपण येथे वाढवु शकतो ,काही प्रापर्टीस असतात की ज्या लेआऊटला हे डिमार्केटेड नसतात आणि हे डिमार्केटेड नसल्याने बांधकाम परवानगी नगररचना विभाग देवु शकत नाही तर त्यांना सुध्दा आपण नियमीत करुन घेतलं, तर त्यातुन सुध्दा आपल्या उत्पन्नात वाढ होईल. मटेरीअल स्टेकींग फी मला वाटत ऑलरेडी ही बांधकाम विभागाला दिलेली आहे जबाबदारी, कौणतही नवीन बांधकाम जर सुरु असल तर तेथे बांधकाम साहित्य साठणेचे चार्जेस घेतले जातात. मला वाटत हे जर आपण नगररचना कडे दिल की, बांधकाम परवानगी देतांनाच आपण ती फि वसुल केली तर उत्पन्न वाढेल आणि त्याचे आपण धोरण ठरवुन घेवु शकतो त्याचे चार्ज टरवु शकतो. तर या सगळया बाजुंमधुन आपल्याला नगररचना विभागाच उत्पन्न वाढ करता येऊ शकते. आणि मला वाटत ते सहज साध्य आहे १० कोटींची वाढ. त्यामुळे प्रशासनाने जे ९ कोटीचा अंदाजपत्रक दिलेल आहे. ते १० कोटी वाढवुन १९ कोटी होऊ शकते. त्यानंतर आपण मालमत्ता उत्पन्न वाढीचा विषय आहे. घरे, दुकाने व गाळा भाडे अस एक हेड आहे.त्यात प्रशासनाची तरतुद ही ६६,१५,०००/- अशी आहे. गाळा भाडे या हेडच्या खाली दोन कॉलम आहे वेगवेगळे, या गाळे भाडे मध्ये कोणते येत ज्या दुकानांचे मुदती संपलेली नाही. त्याचे गाळे भाडे याच्यातुन वसुल होत. आता आपल्याला सगळयांनाच ज्ञात आहे की, अनेक गाळे धारकांनी आपल्याकडे मोटया रकमांचा भरणा केलेला आहे. खरं तर अपेक्षित होत की, त्यांच रिन्युवल आता पर्यंत होऊन जायला पाहिजे होत. पण येत्या काळामध्ये आपल्याला त्यावर निर्णय घ्यावाच लागणार आहे. आणि तो निर्णय झाल्यानंतर ते सगळे दुकानदार आता मागच सर्व भरलेल आहे ते सर्व दुकानदार या हेड मध्ये वर्ग होणार आहे. त्यामुळे या हेडच्या खालच उत्पन्न निश्चितच वाढणार आहे. आणि ते सुध्दा जवळपास १८ कोटींनी वाढु शकतो. त्यामुळे येथे प्रशासनाने प्रस्तावित केलेली आहे ६६,१५,०००/- ती आपण स्थायी समितीमध्ये १८,६६,१५,०००/- अशी करीत आहोत. याच्याशीच संबंधीत एक विषय आहे घरे, दुकाने आणि गाळे हस्तांतरण शुल्क. या विषयावर आपला धोरणात्मक निर्णय होत नसल्यामुळे हा विषय बऱ्याच मोटया कालावधी पासुन प्रलंबीत आहे. हे एक चांगल उत्पन्नवाढ करुन देणार आणि नागरीकांना सोई उपलब्ध करुन देणारा विषय आहे. त्यामुळे त्यात सुध्दा आपण लक्ष घालण खुप आवश्यक आहे. होत काय की, मनपाच्या ज्या मिळकती आहे. तिथल जो ओरिजिनल गाळेधारक किंवा मालक आहे. त्याच ट्रान्सफर होत जात खरेदी बदलत जाते. माझ्याकडुन दुसरं कोणीतरी घेतो, त्याच्याकडुन तिसरं कोणीतरी घेत.आणि मनपा दप्तरी नांवाची नोंद ती पुर्व मालकाचीच आहे. जे नागरीक हा व्यवहार करतात त्यांना सुध्दा खुप अडचणींना सामोरे जाव लागतच आहे. आणि हा निर्णय आपण न घेतल्यामुळे मनपाच महसुल बुडतो आहे. आणि या हेड खाली सुध्दा आपल ५ कोटींच उत्पन्न वाढु शकतो. त्यानंतर जमा बाजु मध्ये प्रशासनाने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान याच्या अंतर्गत ५ कोटी १० लक्षची तरतुद दर्शविलेली आहे. मला वाटत दि.१६ ऑगस्ट २०१८ ला शासनाकडुन आपल्याला पत्र आलेला आहे. त्यामध्ये १०० कोटींची तत्वता मान्यता दिलेली आहे. त्यामुळे त्याच पुर्ण उल्लेख येथे येण अपेक्षित होत. जमा बाजुला तो तसाच तसा येईल आणि तो खर्चाच्या बाजुला कॅरीफॉरवर्ड होईल. आता तो पैसा आलेला नाही, तो पैसा येईल का नाही त्याबद्दल थोडीशी संभ्रम अवस्था आहे. पण तत्वता मान्यता दिलेली असल्यामुळे त्याच संदर्भ आपण जमा बाजुला दर्शवायला हव होत. त्यामुळे स्थायी समिती ते सुध्दा प्रस्तावीत करते जमा बाजुमध्ये जी ५ कोटी १० लक्षची बाजु प्रस्तावीत केली होती. ९४ कोटी ९० लक्ष वाढुन १०० कोटी करण्यात येत आहे. या सगळया जमा बाजु आपण कोणत्या कोणत्या पध्दतीने उत्पन्नात वाढ करु शकतो, स्थायी समितीने जमा बाजुस उत्पन्नात कशी वाढ करु शकतो सगळयांच्या लक्षात आणुन दिलेल आहे. आता खर्च बाजुकडे जाऊ या. खर्च बाजु मध्ये मालमत्ता फेर मुल्यांकन खर्च सर्वेक्षण खर्च, या कामी प्रशासनाने १ कोटींची तरतुद केलेली आहे. मला वाटत ही तरतुद कमी आहे, मनपाच्या सर्व मालमत्तांच प्रॉपर सर्वेक्षण होण खुप आवश्यक आहे. ज्या मालमत्तांकडुन मनपाला उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण होणार आहे. तर त्या कामी आपल्याला खर्चाची तरतुद वाढावी लागणार आहे. ते १ कोटीने वाढुन २ कोटी करण्यात यावी. अस स्थायी समिती प्रस्तावीत करीत आहे. त्यानंतर खर्च बाजु मध्ये स्मशानभुमी एक हेड आहे. स्मशानभुमीच्या हेड खाली मोफत दहन व दफन या बद्दल प्रशासनाने जी तरतुद केलेली आहे १ लाख अशी केलेली आहे. तर या मध्ये पुर्वी ऑडिट शक निघाला होता. आणि ऑडिट शक निघाल्यामुळे हा प्रस्ताव थोडासा बारगळलेला होता. त्यानंतर त्याबद्दल महासभेने निर्णय

घेतलेला होता. त्याचा पाटपुरावा आपण करत आहोत. आणि पॉझिटीव्ह रिस्पॉन्स आपल्याला लवकरच अपेक्षित आहे. त्यामुळे आपण ती तरतुद करुन ठेवणे आवश्यक आहे त्यामुळे आपण येथे मोफत दहन व दफन मोफत लाकडे व बरगे पुरविणे, बरगे पुरविणेसाठी आपले सन्मा.नगरसेविका सईदाताई यांनी आमच्याकडे सुचविलेल होत की ती तरतुद आपली असावी. आणि मोफत लाकडे पुरविणे ही आपल्यापैकी अनेक सदस्यांनी सुचना केलेल्या होत्या. तर त्या सर्व सुचनांचा समावेश करुन आपण १ लाख जी प्रशासकीय तरतुद आहे ही अत्यंत कमी आहे त्यामुळे ती ९९ लक्ष वाढवुन १ कोटी करण्यात यावी. तसेच स्मशान भुमीमध्ये एक हेड आहे. स्मशानभुमी व्यवस्था व दुरुस्ती या मध्ये प्रशासनाने २ लाखची तरतुद केलेली आहे. मला वाटत जर जळगांव शहराच्या सर्व स्मशानभुमी पाहिल्या तर सर्वांची स्थिती फारशी काही चांगली नाही. आपली नेरी नाक्याची स्मशानभुमी जर सोडली तर बाकी सगळया स्मशानभुमींना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. नुकताच काल परवाच्या पेपरला होत की, हिंदुसाठी जी दफनभुमीची जी जागा आहे तेथे अत्यंत कचरा आहे त्याच्यामुळे दफनभुमीला जागाच शिल्लक राहिलेली नाही. एक नऊ महिन्याचा एका वकील बांधवाचा बालक जेव्हा तेथे दफनविधीसाठी नेण्यात आला.खुप मोठा जनपक्षोभ झालेला आहे. या सर्व गोष्टींना नगरसेवक म्हणुन पदाधिकारी म्हणुन आम्हाला सर्वानाच सामोरे जावे लागलेला आहे. या स्मशामभुमी व्यवस्था व दुरुस्ती खाली प्रशासनाने जी २ लाखाची तरतुद केलेली आहे ती खुप कमी दिसत आहे. ती ४८ लाखांनी वाढवुन ५० लाख करावी. निदान आपण सर्वीकडे बेसीक रिक्वायरमेंट पुरवु शकतो. स्मशानभुमीची अवस्था सुधरविण्याकामी आपण काही तरी मदत करु शकु. त्यानंतर बालगंधर्व खुले नाटयगृह, प्रशासनाने या हेड खाली शुन्य तरतुद दाखवलेली आहे. मला खुप वाईट वाटत आहे या गोष्टीच की, खर तर जळगांवचा एके काळी बालगंधर्व नाटयगृह हा मानबिंदु होता. मनपा मालकीचा मला वाटत हे एकमेव नाटयगृह आहे. आज त्याची अवस्था म्हणजे भग्न अवस्थेतच ते गेलेला आहे. आपली सगळयांचीच ती जबाबदारी आहे की, त्याला पुनरूज्जीवित आपण केल पाहिजे. तेथे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. लाईटची व्यवस्था नाही. स्टेजची दुरावस्था तर प्रचंड झालेली आहे. पुर्वी जळगांव शहरामध्ये जे.डी.सी.सी.च नाटयगृह होत. आता संभाजी नाटयगृह झालेल आहे.पण बऱ्याच सांस्कृतीक कार्यक्रमांसाठी संभाजी नाटयगृह घेणे आर्थिक दृष्टया परवडणार नसत. अश्या वेळेला आपल मनपा मालकीच जे बालगंधर्व खुले नाटयगृह आहे त्याची अवस्था सुधारणा खुप आवश्यक आहे. तर याच्या पुनरूज्जीविनासाठी तरतुद वाढविणे खुप आवश्यक आहे. तर प्रशासनाने जी शुन्य तरतुद केलेली होती ते स्थायी समिती ५० लक्ष प्रस्तावीत करीत आहे. त्यानंतर एक पुढच हेड आहे. सार्वजनिक उद्याने बगिचे सुशोभिकरण करणे, मला वाटत आपल्या जळगांव शहराला खुप मोठा धार्मिक, सांस्कृतीक ऐतिहासीक वारसा लाभलेला आहे.फक्त या जळगांव शहरालाच नाही आपल्या जळगांव जिल्ह्याला हा वारसा लाभलेला आहे. त्या वारश्यांच जतन आणि संवर्धन आपण केल पाहिजे. महानगरपालिका म्हणुन हे आपण कस करु शकतो याचा विचार केला तेव्हा अस मनातं आल की, मनपा मालकीच आपल जे शिवाजी उद्यान आहे. जर त्या शिवाजी उद्यानात आपण वैशिष्टपुर्ण जळगांव जिल्ह्याचा वैशिष्ट दाखविणार एक थिम पार्क उभारावे. आता जळगांव जिल्ह्या मध्ये काय काय आहे. जे येथे मोजता येणार नाही इतके वैशिष्ट आहे. वैशिष्टने संपुर्ण जळगांव भरलेला आहे, पाटनादेवी आहे, उनपदेव आहे, पदमालय आहे, शुन्याचा शोध लावणारे भास्कराचार्य , चाळीसगांव, बालकवि टोंबरे हे धरणगांवचे आहे, बहिणाबाई आपल्या जळगांवचा मानबिंदु. जर या सर्व गोष्टी दर्शविणाऱ्या थिम पार्कची आपण निर्मीती केली. तर जळगांवकरांना सतत प्रश्न असतो की, कुठेतरी जायच आहे बाहेर कुठे जाव जळगांव मध्ये बाहेर फिरायला जाण्यासाठी फारशी जागा नाही. तो सुध्दा प्रश्न आपण मनपाकडुन हाताळु शकतो. यातुन उत्पन्न निर्मीती होणार आहे. आणि त्यासोबतच जळगांव जिल्ह्याचा पर्यटन क्षेत्राचा आपण विकास सुध्दा आपण यातुन साध्य करु शकतो. बऱ्याच लोकांना जळगांव जिल्ह्यात बघण्यासारखी स्थळ आहे हे माहित नसत. या सगळयांची माहिती आपण म्युरल्स ,छोटे छोटे बोर्ड बनवुन भित्ती पत्रक लावु , थिम पार्क उभारुन सुविधा जर नागरीकांना करुन दिली.तर जळगांव शहराचा पर्यटन वाढविणेसाठी उपयोगात येईल. ही जागा खुप मोठी आहे तर यात आपण बॉटनिकल गार्डन आणि बटरफ्लाय गार्डन हे सुध्दा करु शकतो. मला वाटत शिवाजी उद्यानासाठी मी हा जो प्रस्ताव मांडलेला आहे. त्यासाठी मनपाची जागा विकसीत करण्यासाठी या जागेच संपुर्ण संकल्पचित्र डी.पी.आर. तयार करून त्याच्यातील प्रकल्पातील प्रकल्प हा उभा करायचा आहे आपल्याला अर्थात मला माहिती आहे की, माझ्या कार्यकाळात एक वर्षाचा कार्यकाळ असतो स्थायी समिती सभापती म्हणुन तर एका वर्षात ऐवढा मोठा उपक्रम राबविला जाणार नाही. पण याची महुर्तमेढ या ठिकाणी टेवली जाऊ शकते. तर फस्ट फेज म्हणुन बगीचे सुशोभिकरण करणे कामी प्रशासनाची जी एक लाख तरतुद आहे १ लाख मध्ये ४ कोटी ९९ लाखाची वाढ स्थायी समिती सुचवत आहे, ती ५ कोटी करण्यात यावी. की जेणे करुन आपल्याला फस्ट फेज म्हणुन शिवाजी उद्यानात मनपा जागा विकसीत करणेच्या दृष्टीने अडथळे दुर करुन जागा ताब्यात घेता येईल. आणि प्रकल्प उभारणीची सुरुवात करता येईल. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभाग या हेड खाली इमारत व्यवस्था व दुरुस्ती प्रशासनाने १० लाखाची तरतुद केलेली आहे. मला वाटत ही तरतुद सुध्दा खुप कमी आहे. यात आपले सर्वांचे एकमत आहे. तर ९० लक्षाने वाढवुन १ कोटी करण्यात यावी. आपल्या सगळयांना सर्व नगरसेवकांना आणि समस्त जळगांवकरांना प्रश्न पडत आहे तो आहे रस्ते व्यवस्था व दुरुस्ती या हेड खाली प्रशासनाने ५ कोटींची तरतुद केलेली आहे. जळगांव शहराच्या रस्त्यांची परिस्थिती पाहता ही तरतुद अत्यंत

City of Jalgaon लिका गाव

तोकडी आहे. ही तरतुद १० कोटींनी वाढवुन १५ कोटी करण्यात यावी. त्यानंतरचा हेड आहे गटार व्यवस्था व दुरुस्ती, प्रशासनाने गटार व्यवस्था व दुरुस्ती या हेड खाली २० लाखाची तरतुद केलेली आहे. जळगांव शहरातल्या अस्तीत्वात असलेल्या सर्वच गटारींची परिस्थिती अत्यंत वाईट आहे की, त्याच्यामुळे ही सुध्दा ६ कोटींनी वाढवुन ६ कोटी २० लाख अशी करण्यात यावी. प्रशासनाने २० लाख तरतुद दिलेली आहे. आपण ६ कोटी वाढवुन ६ कोटी २० लाख करतो आहे. व्यापारी संकुल व्यवस्था व दुरुस्ती - आता जसे मी सांगीतले की, अनेक गाळेधारकांनी गाळयांच्या पोटी भरणा केलेला आहे. आणि भविष्यात अजुन आपल्याला गाळे भरणा घेणे अपेक्षित आहे आणि मनपाचा जे मुख्य उत्पन्नाचा स्त्रोत आपण दाखविलेला आहे जमा बाजु मध्ये ते गाळेभाडे मधुन येणार उत्पन्न हाच आहे. ज्या वेळेला गाळेधारकांकडुन भाडे आपण वसुल करणार. ते आपल्याकडे भाडे भरणार त्यावेळेला त्या व्यापारी संकुलांची व्यवस्था आणि दुरुस्ती करुन देणे क्रमप्राप्त आहे. प्रशासनाने यासाठी १ कोटीची तरतुद केलेली आहे. ती तरतुद ४ कोटींनी वाढविणे आवश्यक वाटते. त्यामुळे ४ कोटींनी तरतुद वाढवुन ५ कोटी करण्यात यावी. याच्या पुढच हेड आहे तांत्रिक फि. प्रशासनाने ५० लाखाची तांत्रिक फी साठी तरतुद ठेवलेली आहे. शहरात भविष्य काळात नविन योजना नविन प्रोजेक्ट येणे अपेक्षित आहे आणि त्यासाठी वेळोवेळी तांत्रिक सल्ला घ्यावा लागतो. त्यासाठीची फी सुध्दा भरमसाटच असते. मला असे वाटते की, ५० लाखाची जी तरतुद आहे ती पुरेशी टरणार नाही. आणि तरतुद नसल्यामुळे आपल्याला पुढे काही समस्यांचा सामना करावा लागु नये म्हणुन ही तरतुद ही १ कोटी ५० लाखाने वाढवुन २ कोटी करण्यात येत आहे. त्यानंतर आपले सगळयांचे सल्ले आहेत. मागे स्थायी मध्ये एक विषय झाला होता आपला, नगरसेवक निधी बद्दलचा सगळेच पक्षाचे सदस्यांची ही मागणी होती की, अनेक नगरपालिकेमध्ये नगरसेवक निधी आहे. आणि असतो. मागे आपल्याकडे सुध्दा तसा होता पण मध्यंतरी ती पध्दत बंद झालेली होती. आपली सर्वांची ही मागणी होती तर त्या सभेनंतर आपण प्रशासनाला एक पत्र दिल होत की, या बजेट मध्ये या निधीची तरतुद करा. या हेड खाली प्रशासनाने ८० लाखाची तरतुद केलेली आहे म्हणजे प्रत्येक नगरसेवक १ लाखाची तरतुद प्रशासनाने केलेली आहे. पण ती अतिशय कमी आहे. ती कमीतकमी ५ लाख प्रति नगरसेवक असली पाहिजे. तर ती ३ कोटी २० लाखाने वाढवुन ४ कोटी करावी आणि या मध्ये याच स्वतंत्र लेखाशिर्षक उघडण्यात याव. याच स्वतंत्र अकाऊंट उघडुन त्याच्यातुनच खर्च करावे आणि हा निधी दुसरा कुठे ही वर्ग होणार नाही याची सुध्दा प्रशासनाने नोंद घ्यावयाची आहे. साधारणता प्रत्येक नगरसेवकाच्या नावावर आपल्याला ५ लाखाचा खर्च दाखविता येणार. नंतर क्रिडा आणि सांस्कृतीक विभाग हे एक हेड आहे. या मध्ये राष्ट्रीय विजेता योजना यात प्रशासनाने शुन्य तरतुद केलेली आहे. मला वाटत, खेलो इंडिया जी आपली संकल्पना आहे त्याला चालना देण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेची सुध्दा जबाबदारी आहे. राष्ट्रीय खेळाडु जर आपल्या शहरात असतील तर त्यांना आपण प्रोत्साहन दिल पाहिजे. प्रोत्साहन करण्यासाठी योग्य तरतुद आपल्याकडे असली पाहिजे जेणे करुन आपण त्यांचा योग्य सन्मान करु शकतो. जळगांव शहरात काही राष्ट्रीय विजेते खेळाडु आहे. तर ही तरतुद शुन्य वरुन ५० लाख करण्यात यावी. त्यानंतर पुढच एक हेड आहे पर्यावरण विभाग, पर्यावरण विभागाच्या अंडर वृक्ष गणना करणे, या साठी ५ लाखाची तरतुद आहे. ही तरतुद ४५ लाखाने वाढवुन ५० लाख करण्यात यावी. नविन झाडे लावणे यासाठी ५ लाखांची तरतुद आहे. ही सुध्दा ४५ लाखाने वाढवुन ५० लाख करण्यात यावी. ट्रीगार्ड साठी ६ लाखाची तरतुद आहे ती २० लाखाने वाढवुन २६ लाख करण्यात यावी. आणि झाडे देखभाल व व्यवस्था यासाठी ५ लाखाची जी तरतुद आहे ती ४५ लाखाने वाढवुन ५० लाख करण्यात यावे. सुंदर जळगांव, स्वच्छ जळगांव हरीत जळगांव आपल्या संकल्पना आहे या संकल्पनांसाठी या तरतुदींमध्ये वाढ करणे आवश्यक आहे. अजुन मला एक अशी घोषणा करावीशी वाटते. जे मालमत्ताधारक आपल्याकडे एप्रिल मध्येच घरपट्टीचा भरणा करतात. जे मुदतीच्या पहिले भरणा करुन रिबीट घेतात. सर्व मालमत्ताधारकांना सन्मान म्हणुन मनपाने जुन महिन्यामध्ये घरपोच एक भारतीय वृक्ष भेट म्हणुन द्यावा. त्यांना हे आवाहन कराव की, आपण जे रिबीट घेतलेल आहे त्यातुन आपण त्या वृक्षाच संगोपन जतन कराव आणि हरीत जळगांव करण्यासाठी हातभार लावाव. जे जे मालमत्ता धारक मुदतीच्या पहिले भरणा करुन आपल्या वसुली मध्ये मदत करता आहे. त्यांचा सन्मान आपण घरपोच केल्यामुळे त्यांना सुध्दा आनंद होणार आणि एक नविन संकल्पना आपण येथे आणणार आहोत. हरीत जळगांव कडे आपण या दृष्टीने वाटचाल करणार आहोत. त्यानंतर प्राथमिक शिक्षण मंडळ हे जे हेड आहे. या मध्ये देखील क्रिडास्पर्धा व योग प्रशिक्षण अनुदान या मध्ये प्रशासनाने १ लाखाची तरतुद केलेली आहे. त्यात ४ लाख वाढवुन ५ लाख करण्यात यावे. त्यानंतर महाराष्ट्र सवर्ण जयंती नगरोत्थान अभियान याच्या बद्दल त्याच जसा जमा बाजु मध्ये जोडलेला आहे की, तत्वता मान्यता मिळालेली असल्याने जमा बाजुला जसा वाढेल तसेच खर्च बाजुला त्याची नोंद घेण्यात यावी. त्याच्यात पुढचे हेड आहे. आर्किटेक्ट फी मुळातच आपल आर्किटेक्ट पॅनल आहे. आणि त्यांच्याकडुन आपण अनेक कामे करुन घेतो. प्रशासनाने या हेडला शुन्य रकमेची तरतुद केलेली आहे.शहर जेव्हा विकासाकडे वाटचाल करतो अनेक नविन योजना अपेक्षित असतात. आणि या सगळयांसाठी आपल्याला तांत्रिक सल्लागार अपेक्षित असतात. आर्किटेक्ट फी म्हणुन कमीतकमी १ कोटीची तरतुद ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे ती शुन्य वरुन तरतुद १ कोटींची करण्यात यावी.

**श्री.कपिल पवार , मुलेअ :-** नविन गटारी नविन गटारीची २ कोटी तरतुद आहे एक शुन्य जास्त चुकुन आल्यामुळे २० कोटी दिसत आहे.

**मा.सभापती :-** तरी मला असे वाटते की, २ कोटी तरतुद ही नविन गटारींसाठी खुप कमी आहे. तर ती सुध्दा आपल्याला वाढविणे आवश्यक आहे. नविन गटारी आणि नाले या हेड साठी ती १२ कोटींनी आपण वाढवावी. आणि १४ कोटीची तरतुद करावी. कारण अनेक भागांमध्ये अद्याप गटारीच झालेल्या नाही. अनेक नगरसेवक या गोष्टीमुळे त्रस्त आहे. तर हि सुविधा देणे अत्यावश्यक आहे. म्हणुन ही तरतुद वाढवुन १४ कोटी करण्यात येत आहे. त्यानंतर एक महत्वाची घोषणा मला या पुढच्या हेड बद्दल करायची आहे. नविन इमारती, फायर स्टेशन बांधणे व वार्ड ऑफिस बांधणे व इतर तसे हेड प्रशासनाचे नमुद आहे. ज्या हेड मध्ये प्रशासनाने १५ लाखाची तरतुद केलेली आहे. मला असे वाटते की, आपले जे वार्ड ऑफिसेस आहे. या कार्यालयांना आपण मर्यादीत अधिकार दिलेले आहे. आणि यांना मर्यादीत जबाबदाऱ्या ही आहे.खर तर या जबाबदाऱ्या आणि अधिकार मध्ये वाढ होणे खुप आवश्यक आहे. या सर्व कार्यालयांचे रुपांतर आपण मिनी मनपात करणे अत्यंत आवश्यक आहे. मनपा मध्ये जो केंद्रीकृत झालेला खुला भुखंड विभाग आहे. त्याचे प्रभाग समिती निहाय विभागणी करण्यात येऊन विकेंद्रीकरण करण्यात याव. तसेच सार्व.बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, स्वच्छता विभाग, पाणीपुरवठा विभाग, अतिक्रमण विभाग, घरपट्टी, अग्निशमन हे सगळेच विभाग त्या त्या प्रभाग अधिकाऱ्याच्या अधिपत्या खाली देण्यात यावे . याच्यातुन साध्य काय होणार आपल्याला तर Distribution of power जे आपण म्हणतो. ते केल्यामुळे, Deligation of Power केल्यामुळे काम करण सोप जाईल.कामाचा स्पीड वाढेल. कामाचा दर्जा सुध्दा वाढेल. हे सगळ एकत्रीकरण झालेल आहे. तर याचे विकेंद्रीकरण केल्याचे फायदे आपल्याला निश्चितच मिळतील. नागरीकांसाठी सुध्दा ते खुप सोईच होणार आहे. त्यांना सगळया सुविधा त्यांच्या प्रभागातच मिळतील. या सर्व गोष्टी करण्यासाठी आपल्याला सर्व प्रभाग समिती कार्यालय अद्यावत करावे लागतील. तर ही जी १५ लाखाची जी तरतुद आहे ही खुप कमी आहे. त्याच्यामध्ये वाढ करण्यात यावी. ती २५ कोटीने वाढ करण्यात येत आहे. म्हणजे ही २५ कोटी १५ लाख अशी तरतुद टेवावी. प्रभाग कार्यालय सुसज्ज होतील पण याच इम्प्लीमेंटेशन मात्र या आर्थिक वर्षापासुन कराव.ते कार्यालय होतील आणि मग आपण इम्प्लीमेंटेशन करु अस न करता ही जी संकल्पना आपण स्थायी समिती म्हणुन मांडलेली आहे. याच इम्प्लीमेंटेशन ही या आर्थिक वर्षापासुन करण्यात याव. या सर्व प्रभाग समिती कार्यालयांना मिनी मनपात रुपांतर करण्यात याव. या हेड खालीच आपल्याला पिंप्राळा भागामध्ये पिंप्राळा भाग हा आता खुप मोठा विस्तार झालेला आहे.जनसंख्या तेथील खुप वाढलेली आहे. पण महानगरपालिकेच सुसज्ज रुग्णालय एक ही पिंप्राळा भागात नाही. एक हुडकोला फक्त आपल ओ.पी.डी.चालत. बाकी रुग्णालय तेथे नाही. आणि त्याच्यामुळे त्या भागातल्या नागरीकांना खुप त्रास सहन कराव लागत. आपल्याकडे सोमाणी मार्केट मधील फस्ट फ्लोअर ही जागा ऑलरेडी अव्हेलेबल आहे या गोष्टीसाठी. या हेड खाली जे आपण २५ कोटी वाढत आहे त्यातच पिंप्राळावासीसाठी रुग्णालय सुध्दा आपण या हेड खाली करण्यात याव. येथे मला अजुन एक सांगायच आहे की, किरकोळ वसुली विभाग असा एक विभाग आपल्याकडे आहे. नांव त्याच किरकोळ वसुली आहे पण या विभागाखाली सगळंच होत. म्हणजे किरकोळ वसुलीच माणुस होकर्सच्या पावत्या फाडायला ही जातो. काही काही ठिकाणी जे प्रदर्शने लागतात तेथे सुध्दा किरकोळ वसुलीचाच माणुस जातो. आपल उत्पन्नाचा जो प्रमुख स्त्रोत आहे मनपाचे गाळे भाडे ती वसुली सुध्दा किरकोळ वसुली विभागच करतो. मला वाटत हे आपण बदलविणे आवश्यक आहे. किरकोळ वसुली विभाग हा किरकोळ वसुली विभागच असायला पाहिजे. गाळे भाडेसाठी आपण स्वतंत्र विभाग, स्वतंत्र यंत्रणा आपण करावी. गाळे भाडे वसुली आणि हस्तांतरण शुल्क या भागासाठी स्वतंत्र विभागाची निर्मीती करावी. आणि तो विभाग त्या प्रभाग समितीला जोडण्यात यावा. यामुळे ते सगळयांसाठीच सोईच होईल. याच्या मध्ये उत्पन्न वाढविणेसाठी आणि महसुल निर्माण करण्यासाठी खुप मोटी मदत होईल. त्यानंतर प्रशासनाचा हेड आहे नविन रस्ते- जळगांव शहरातला सगळयात जास्त चर्चेला जाणारा विषय नविन रस्ते. सगळया सदस्यांची यासाठी आग्रहाची मागणी होती की, यासाठी भरघोस तरतुद असणे आवश्यक आहे. प्रशासनाने याच्यासाठी १५ कोटीची तरतुद केलेली होती. त्यामध्ये आपण ५५ कोटीची वाढ करतो आहे. आणि ती तरतुद ७० कोटी अशी करतो आहे. मला वाटत कोणत्याही शहराची प्रगती एकंदरीत प्रगती शहरातील रस्ते जोडणीवर अवलंबुन असते. त्यामुळे येत्या आर्थिक वर्षात काही प्रमुख जोड रस्ते उपलब्ध करुन देणे मला आवश्यक वाटत. त्यामध्ये काशिनाथ लॉज ते टीव्ही टॉवरचा रस्ता आपण करु शकतो. ममुराबाद रस्ता ते आसोदा रस्ता, गाडगे बाबा चौक ते मोहाडी रस्ता आणि शिरसोली रोड ते सुप्रिम कॉलनी (स्टेट हायवेला जोडणारा रस्ता) , रामेश्वर कॉलनी कॅन्डी फॅक्टरी ते एम.आय.डी.सी. चा जोड रस्ता तसेच दिपक फुड ते गिरणा पंपींग रोड हे रस्ते होणे अत्यावश्यक वाटत. त्यासाठी भरघोस तरतुद वाढविण्यात आलेली आहे. १५ कोटी वरुन आपण ७० कोटीवर जात आहोत. त्यानंतर भांडवली खर्च - नविन वाहन व आरोग्य वाहन खरेदी या हेड खाली प्रशासनाने २ कोटी ५० लाखाची तरतुद केलेली आहे. जळगांव शहराचा विस्तार आता ज्या पध्दतीने होत आहे. त्याप्रमाणे जळगांव शहराच्या इमारतींची उंची आता वाढत आहे. अनेक उंच इमारतींची निर्मीती जळगांव शहरात झालेली आहे. आजच्या घडीला आपल्याकडे जे फायर ॲण्ड सेफ्टीची जी यंत्रणा आहे. ती चौथ्या मजल्यापेक्षा वरती आग विझविण्यासाठी सक्षम नाही.मला वाटत हा विषय अनेकदा महासभेमध्ये स्थायी समिती सभेमध्ये

City of Jalgaon पालिका ळगाव

चर्चेला गेलेला आहे.या साठी आपल्याला जी फायरची गाडी घेणे अपेक्षित आहे उंच इमारतींसाठी त्यासाठी आपल्याला तरतुद वाढविणे खुप आवश्यक आहे. त्याच्यानंतर फोम फायटर, जस ज्वलनशिल पदार्थांना जी आग लागते. केमिकल फॅक्टरी वगैरे असणार त्यांना जेव्हा आग लागते. त्यासाठी फोम फायटर हा एक वेगळा प्रकार आहे. त्यासाठी प्रशासनाने जी २ कोटी ५० लाखाची तरतुद या हेड खाली केलेली आहे ती ५ कोटींनी वाढवत आहोत. ७ कोटी ५० लाख अशी तरतुद या ठिकाणी ठेवण्यात यावी. त्यानंतरतरचा हेड आहे मनपा हद्दीतील रेल्वे उड्डानपुल, भुमिगत मार्ग आणि पादचारी मार्ग, यासाठी प्रशासनाने ७ कोटीची तरतुद केलेली आहे. पण ती सुध्दा अत्यंत कमी आहे. उदाहरण द्यायच असल तर ब्राम्हण सभेचा अंडरपास आपण प्रपोज केलेला आहे. तेथे जवळपास ६.७५ कोटीच अंदाजपत्रक रेल्वेने सादर केलेल आहे. हे त्यांनी सादर केलेल होत पुर्वी त्यात काही बदल होवु शकता जेव्हा आपण हे प्रकल्प हाती घेऊ तेव्हा. भुमिगत गटारी जेव्हा आपण करु त्यावेळेला आपल्याला सांडपाणीचाही विचार कराव लागणार, ती ७ कोटीची रक्कम ३ कोटीने वाढवुन १० कोटी वाढवावी. या नंतर एक नविन हेड प्रस्तावीत करायचे आहे. आपण बघतो की, जेव्हा मोठया शहरात आपण जातो. तेथे गेल्यानंतर दिशादर्शक फलक आणि रस्ते मार्ग सुरक्षा फलक प्रत्येक शहरामध्ये दिसतात. फक्त जळगांव शहरात हे कुठेही दिसत नाही. त्यात काय होत नविन आलेल्या माणसाला जायच असत पिंप्राळयात पण तो पिंप्राळा ओलांडुन एम.जे.कॉलेजच्या ही पुढे निघुन जातो. कारण कुठेच दिशादर्शक फलक नाही. रस्ते सुरक्षा फलक असणे तेवढेच आवश्यक आहे. अपघातांच प्रमाण आपण याच्याने कमी करु शकतो. तर हे नविन हेड आपण प्रस्तावीत करीत आहोत आणि २ कोटी तरतुद करीत आहोत. त्यानंतर अजुन एक सोलर पॅनल उभारणे, मनपाची जी इमारती आहे व मनपाच्या इतर ज्या मिळकती आहे. तेथे आपण टप्प्या टप्प्याने सोलर पॅनल उभारणे खुप आवश्यक आहे. हरीत उर्जा संवर्धन या संकल्पनेला चालना मिळणार आहे आणि याचा उपयोग असा होईल की, आपल्याला जे खुप जास्त बिल भराव लागत आहे मनपाच्या प्रशासकीय इमारतीच असो, वाघुरच जे लाईट बिल येत ते असो किंवा इतर ठिकाणांच हे सोलर पॅनल बसविण्यासाठी आपल्याला खर्च निश्चितच येईल. पण एकदा तो वसुल झाल्यानंतर आपल्याला पुढचे बरेच वर्ष ती ऐनर्जी आपल्याला फ्रि ऑफ कॉस्ट वापरायला मिळेल. तरी सोलर पॅनल उभारणीसाठी आपल्याला २ कोटींची तरतुद करायची आहे. नंतर मनपाच उत्पन्न वाढविण्यासाठी जे प्रयत्न करायचे असतात त्या दृष्टीने आपल्याला काही खर्च सुध्दा अपेक्षित आहे. जसा आपण मनपाच्या मालकीचा एक भुखंड नुकताच ताब्यात घेतला होता. फायनल टी.पी. स्कीम २ मधला अंतीम भुखंड क्र.१६७ ब जर सोप्या भाषेत सांगितल तर रेडक्रॉस सोसायटीच्या मागची जी जागा आपण ताब्यात घेतलेली आहे. ती जागा विकसीत करण्यासाठी आपण २ कोटी खर्चाची तरतुद ठेवावी. अर्थात त्यासाठीच धोरण महासभेसमोर टरविल जाईल. त्यानंतर ती जागा विकसीत होईल. पण त्यापोटी २ कोटीची तरतुद आपण करुन ठेवावी. त्यानंतर पाणी पुरवठा व्यवस्था आणि दुरुस्ती या हेड खाली प्रशासनाने १ कोटींची तरतुद केलेली आहे. पण ती तरतुद सुध्दा पुरेशी नाही. तेथे सुध्दा अनेक गोष्टींची आवश्यकता आहे. त्यात सुध्दा २ कोटींनी वाढवुन ३ कोटी करण्यात यावी. मागच्या काळात पायाभुत सोईसुविधांचा अनुशेष होत आहे याचा मला दुख आहे. पण आज हा आपण जो प्रस्तावीत बजेट मांडत आहोत. जळगांव शहराच्या सर्वांगिन विकासासाठी भरघोस तरतुद असणारा बजेट मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. याच मला मनस्वी आनंद आहे. आणि मला विश्वास वाटतो की, जळगांव शहराच्या पायाभुत सुविधांचा अनुशेष निश्चितच भरुन येईल. आणि सर्व सामान्य जळगांवकरांच आयुष्य सुकर करण्यासाठी आपण सगळे मिळुन प्रयत्न करु या. अर्थ संकल्पात या सगळया बदल ज्या सुचविलेल्या आहे. अर्थातच मला प्रशासनासोबत सगळे सन्मा.सदस्यांच सहकार्य लाभलेल आहे. सर्व सन्मा.सदस्यांनी वेळोवेळी सगळया गोष्टी सुचविल्या. स्थायी समितीत सदस्य जरी नसले तरी आपल्या सभागृहाचे जे सदस्य आहेत.स्विकृत सदस्य विशाल भाऊ त्रिपाटी यांच खुप मोट सहकार्य मला लाभलेल आहे. तुम्हा सगळयांचे मी येथे आभार मानते. तुम्ही सर्वांनी जे मला सहकार्य केल मार्गदर्शन केल. नितीन भाऊंनी सुध्दा अनेक गोष्टींमध्ये मार्गदर्शन केलेल आहे. त्यांचा अनुभव तितका राहिल्यामुळे त्यांच सुध्दा मार्गदर्शन मला लाभलेल आहे. सर्व सदस्यांच, सभागृहाच आणि सर्व ज्ञात अज्ञात व्यक्तींच मला या बजेटसाठी मार्गदर्शन लाभलेले असल्याने सगळयांच मी मनापासुन आभार मानते. धन्यवाद.

**श्री.सुनिल खडके :-** सन्मा.सभापतीताईंनी आता जमा खर्चा बाजुत ज्या काही वाढ सुचविल्या आहे त्यांस मान्यता देण्यात यावी ही सुचना करतो.

**सौ.रेश्मा काळे :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.नितीन लढढा :-** मा.सभापती महोदया, आपण आपल्या कार्यकाळातला पहिला अर्थसंकल्प सादर केला. मनापासुन अभिनंदन करतो एक महिला सभापती या नात्याने आपण आपला पहिला अर्थ संकल्प सादर केला. निश्चितपणे आपण बघतो. आपल्या व्यक्तीगत खाजगी जिवनातही संपुर्ण अर्थसंकल्प हा महिलेच्याच हातात असतो. कारण योग्य पध्दतीने काटकसर करुन संसाराचा गाडा चालविण्याच कौशल्य हे महिलेतच असत.परंतु उत्पन्नाचं जे साधन असत ते पुरूषमंडळी कडेअसतं पुरुष आपल्या व्यवसायातुन म्हणा किंवा आपल्या नोकरीतुन म्हणा पैसा कमावुन आणतात आणि आपल्या पत्नीच्या हातात देतात आणि पत्नी तिच्या कार्यपध्दतीने त्याचं नियोजन करत असते. परंतु २०१९ आणि २०२० यासंपुर्ण अर्थ संकल्पाचा अभ्यास जर आपण केला तर पुरूष मंडळींनी पगाराची अर्धीच रक्कम घरी आणलेली आहे. मग अर्ध्या रकमेमध्ये पत्नीने त्या

अर्ध्यारकमेमध्ये तो संसाराचा गाडा चालवायचा कसा ? खुप त्यांच्या मनामध्ये विचार असतात मुलांचे शिक्षण आहे , मुलांची हौसमौज आहे , बाहेरगांवी ट्रीप आहे सगळयाकाही गोष्टी असतात .परंतु पुरूष १ रूपयाच्या ऐवजी ५० पैसे घरी आणेल तर त्या परिस्थितीत त्यासंपुर्ण कुटुंबातील त्या गृहीनीने ज्या गरजा आहेत त्या पुर्ण होतात तर अशी परिस्थिती या सभागृहाला अवगत करतो की , की साधारणत: १ एप्रिल २०१९ सुरूवातीला प्रभाग क्रं. १ ते ४ ची एकूण मागणी जी होती मालमत्ता कराची ती होती ७६ कोटी ३१ लक्ष २८,८,५५ रूपये होती , १ एप्रिल २०१९ म्हणजे २०१८-१९ ची थकबाकी आणि २०१९-२० ची मागणी अशी मिळुन ७६ कोटी ३१ लक्ष २८,८,५५ रूपये होती आणि त्याचं वसुलीचे प्रमाण आणि ही सगळी प्रशासनाकडुन अधिकृतपणे घेतलेली आकडेवारी आहे ,प्रत्येक प्रभाग निहाय वसुलीची आकडेवारीची मागणी केली होती ती काल संध्याकाळ पर्यंत ती दि.११/०३/२०२० अखेर प्रभाग क्रं. १ ते ४ ची वसुल रक्कम जी आहे. रुपये ४१,५१,१५,७५९/- याची सरासरी जर आपण काढली तर साधारणता ५४% पर्यंत ही पोहचते. आता मला सांगा ४६% वसुलीच प्रमाण अजुन ही मनपाच्या खात्यात जमा झालेल नाही. आता आर्थिक वर्ष संपायला मोजुन १५ दिवस राहिलेले आहे. जास्तीत जास्त २, ५, ६% याच्यात वाढ होऊ शकेल. म्हणजे ५४% हे ५८ किंवा ५९% पर्यंत जाईल. परंतु ४०-४५% वसुलीच प्रमाण कमी असेल. तर त्या ४०-४५% उत्पन्नाच्या आधारा वरती आपण जे योजना मागच्या वर्षी आखलेल्या होत्या ते आपण पुर्णत्वास आणु शकत नाही. हा एक उत्पन्नाचा स्त्रोत आहे मालमत्ता कर, दुसरा उत्पन्नाचा स्त्रोत आहे खुला भुखंड कर. खुला भुखंड कराची सन २०१९-२० ची मागणी जी होती. ती रु. ३९,५५,४४,८६४/- होती. आणि खुप गंभिर विषय आहे हा. म्हणजे याच्या संदर्भात आतापर्यंत जो वसुल झालेल आहे. रु.३९,५५,४४,८६४/- पैकी रु.२,५०,८२,६४७/- संपुर्ण आर्थिक वर्षात यात उत्पन्न काय आलेल आहे रु.२,५०,८२,६४७/- आपण या पुर्नमुल्यांकन विभागाच्या अनुषगांने आपण जर वाढ केली जी अपेक्षित आहे वाढ. आता आपण ही डिमांड मध्ये रु.३९,५५,४४,८६४/- पैकी रु.२,५०,८२,६४७/- वसुल करतात. साधारणता ३७ कोटी रुपयांचे डिमांड कमीचे दिसते. म्हणजे त्याच जर वसुलीच प्रमाण जर बघितल तर फक्त ६% आहे. ६% वसुली झालेली आहे संपुर्ण वर्षात.

**मा.सभापती :-** हे जे मिनी मनपा जे प्रपोज केलेल आहे. हे त्याचसाठी केलेल आहे.

**श्री.नितीन लढढा :-** तुम्हाला गंम्मत सांगतो, अधिक्षक, खुला भुखंड विभाग यांच्याकडुन माहिती घेतली असता. त्यांनी दिलेला पत्र आहे. त्यात टिप टाकुन दिलेली आहे की, टिप - सदर डिमांड खुल्या भुखंडावर सुमारे ७० ते ८०% इतक्या प्रमाणे बांधकाम झालेले आहे. परंतु त्या खुला भुखंडाचे मागणी रजिष्टर मध्ये नोंद आहे तशीच आहे. ती नोंद कमी झाल्यास बऱ्याच प्रमाणात मागणी कमी होईल. म्हणुन सदर रक्कम निर्लेखित करणे आवश्यक आहे. आता जर याच कॅलक्युलेशन केल तर ३७ कोटी रुपयाच्या वसुली पोटी ७०-८०% डिमांड निर्लेखित होईल असे अधिक्षकांच म्हणण आहे. आणि त्या अधिक्षकांच्या म्हणणे प्रमाणे जी आज डिमांड ३७ कोटीवर आहे ती आज ७ कोटी वरती येऊन जाईन. म्हणजे या हेड द्वारे आपण ३७ कोटी रुपये कॅलक्युलेट केले. पुढच्या वर्षाच्या अर्थ संकल्पात तरतुद म्हणुन साधारणता खुला भुखंड विभागाकडुन आपल्याला ३७ कोटी उत्पन्न अपेक्षित आहे. आयोजकांनी याच्या मध्ये दिलेले आहे.परंतु जर कर अधिक्षक खुला भुंखड अधिक्षकच्या सांगण्यानुसार ७०-८०% डिमांड कमी झाली तर ३७ कोटीची डिमांड सरळ सरळ ७ कोटीवर येऊन जाईल. म्हणजे काय होईल त्या ३० कोटीचा पुन्हा तुमच्या काही प्रस्तावीत योजना असतील. त्याच्या मध्ये तो खड्डा पडणार. ज्याला आपण शेवटी म्हणतो की, अर्थ संकल्पाला अर्थच उरत नाही. कारण येणाऱ्या खर्चाचे ज्या अर्थाने आपण नियोजन केलेल असत. ते अर्थच येणार नसेल तर जे नियोजन आहे ते नियोजन पर्यायी कोल्यापस होईल. दुसरा गाळे भाडे नुकसान भरपाईची रक्कम, म्हणजे व्यापारी संकुलांच्या गाळे भाड्यांच्या नुकसानीचे संदर्भातले ८१ क च्या नोटीसा दिल्या. साधारणता कुठल्याही ज्या नोटीसेस आहे. मागणीचे बिले आपण ज्याला म्हणतो की, ही साधारणता एप्रिल महिन्यामध्ये बजावली गेली पाहिजे. ज्या वेळेला नविन आर्थिक वर्ष सुरु होतो. त्यावेळेला अगाऊ रक्कमा म्हणुन ती तुमची मागणी ही संबंधीत गाळेधारक असेल मालमत्ता धारक असेल खुला भुखंड धारक जो कोणी असेल. ही बिले एप्रिल मध्ये वितरीत केली गेली पाहिजे. परंतु आजपावेतो सुध्दा अशी परिस्थिती आहे , की मुदत संपलेल्या गाळे धारकांना नुकसान भरपाईची मागणी बिले अद्याप पावेतो १००% वितरीत झालेले नाही. आणि २०१९-२० च्या आकडेवारीच्या अनुषंगाने २०१९-२० ला प्रशासनाने जो अर्थ संकल्प सादर केलेला होता ती मागणी जशीच्या तशी प्रस्तावीत करण्यात आलेली होती. त्यावेळेला त्याची मागणी होती. ३३६,२०,८३०००/- ही मागणी होती. आणि अद्याप पावेतो त्याच्यामधुन वसुली झाली ६२,९५,६३,७२८/- हे कालचेच आकडे आहे म्हणजे साधारणता ३३६,२०,८३०००/- पैकी ६२,९५,६३,७२८/- ही वसुल झालेली रक्कमेची टक्केवारी जर काढली तर साधरणता १८.७५% ही वसुली आहे. आता याच्यानंतर काय झाल की, याच्यामध्ये प्रशासनाने बिलांमध्ये दुरुस्त्या केल्या. म्हणजे हे ३३६,२०,८३०००/- ही आकारणी तत्कालीन प्रशासनानेच केलेली होती. त्यावेळेस ही कर्मचारी अधिकारी महानगरपालिकेचे होते. तत्कालीन महानगरपालिकेचे आयुक्त होते. त्यांनी जे काही रितसर कायदेशीर बाबींची पुर्तता करुन ही मागणी या गाळेधारकांकडे बिल म्हणुन देण्यात आलेली होती. परंतु याच फेर मुल्यांकन करण्यात आल. फेरमुल्यांकन मध्ये ३६६ कोटीच्या मागणी मध्ये साधारणता ३०% पर्यंत ही मागणी रिव्हिजन करुन कमी करण्यात आली. म्हणजे साधारणता ३३६ कोटी पैकी मनपाच्या १०० कोटी उत्पन्नावरती त्याच्या मध्ये पाणी सोडविलेले

दिसत आहे. चुक होती की योग्य होती. पुर्वीची चुकीची होती की आताची दुरुस्ती केलेली चुकीची आहे. तो अभ्यासाचा भाग आहे परंतु १०० कोटी रुपयाची मागणी कमीची झालेली असेल तर ३३६ कोटीच्या ऐवजी २३६ धरली असती आणि त्यातुन जर ६२ कोटी ९५ लक्ष वसुल झालेली असेल तरी साधारणता १८० कोटी रुपये या गाळे धारकांकडुन येणे अपेक्षित आहे. परंतु याच्या संदर्भात ही संपुर्ण मागणी त्याच फेर मुल्यांकन करुन दिल्यानंतर ही याच्या मध्ये बऱ्याश्या व्यापारी संकुलांची हीच परिस्थिती आहे की, ती मागणी वसुल होईल की नाही याच्याबाबतीत मनात शंका आहे आणि ते देऊ शकतील की नाही ही सुध्दा त्यांची परिस्थिती आहे. अश्यात आपण आज जो काही रस्ते विकासासाठी जो निधीचा विचार करत आहे. की आपल हे मार्केट मधील उत्पन्न प्राप्त होईल आणि त्या अनुषंगाने आपण ५० कोटीचे रस्ते, २०-२५ कोटीची इमारती या सगळा काही विचार करतो आहे. या सगळयांवर एक प्रश्न चिंन्ह निर्माण होतो. या गाळे धारकांचा इतिहास २०१२ पासुन मी अत्यंत बारकाई ने मी अभ्यास केलेला आहे.आणि वेळोवेळी याच्या मध्ये कुठेतरी पॉलिटीकली इन्टरफेअर झाल्यामुळे आज ही परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्याच्यावर मला राजकारण करायचे नाही. परंतु ज्या अनुषंगाने आपण अर्थ संकल्पात येणारा रुपया आणि अर्थ संकल्प खर्च होणारा रुपया याच जे नियोजन करता आहे. ते नियोजन पुर्णत्वास जाण जशी जळगांव वासीयांची इच्छा आहे तशी आमची सुध्दा इच्छा आहे. परंतु याच्यातल्या कायदेशीर अडचणी म्हणा किंवा याला राजकीय अडचणी म्हणा हे भविष्यात निर्माण होतील. आणि आपला जो सर्कल आहे ते येऊन जाऊन येथेच पुर्णत्वास जाईल. मनपाचा घरकुल विभाग, घरकुलला सेवा शुल्क म्हणुन आपण आकारतो. म्हणजे कुठल भाड आपण त्या घरकुल धारकांकडुन वसुल करत नाही. ते आपण त्यांना विनामुल्य दिलेल आहे. सेवा शुल्क रु.५/- रोज प्रती ते आपण त्यांना जे सेवा प्रोवाईड करतो, दिवाबत्तीची सुविधा असेल, पाणीपुरवठाची सुविधा असेल, आरोग्याची सुविधा असेल. या सर्व सेवांच्या ऐवजी आपण फक्त रु.५/- नाममात्र सेवाशुल्क त्यांच्याकडुन आकारतो. आणि त्याची सन २०१९-२० या अर्थ संकल्पात मागणी होती रु.१५,१७,०५,०००/- आणि ३० नोव्हेंबर अखेर साधारणता १,७१,०८०/- इतक वसुल झालेल आहे. म्हणजे टक्केवारी काढली तर १.१२% म्हणजे साधारणता १% वसुलीच प्रमाण त्याच्यामध्ये आहे. सुविधा मात्र सगळे द्यावे लागतात. काही स्थानिक नगरसेवकांकडे नागरीक तक्रारी करतात त्यांच्या रस्त्यावर खर्च करावा लागतो. त्यांच्या पाणीपुरवठेवर खर्च करावा लागतो , दिवाबत्तीवर खर्च करावा लागतो, परंतु त्या दृष्टीने वसुलीच जे प्रमाण आहे ते अतिशय नगण्य आहे. जर कधी विकास कामांमध्ये आपण ही रक्कम आपल्या मनपा खजिन्यात येईल असे गृहीत धरुन केलेल असेल तर ते नियोजन ही याच्यामुळे कमी पडेल. आणि याच्यासाठी प्रयत्न प्रशासन का करत नाही. काय झाल ताई सत्ता बदल झाली पुर्वी आम्ही सत्तेत होतो. आम्ही आमच्या वतीने याच्यावर प्रयत्न केले नाही केले याच्यातला भाग नाही. आम्ही ही वसुलीच्या अनुषंगाने ही वसुलीचा मक्ता सुध्दा देण्यात आलेला होता. जो कोणी मक्तेदार ही रक्कम वसुल करुन आणुन देईल. त्याला २०-३०% जो काही त्यावेळेला पॉलिसी टरलेली होती. तसे प्रयत्न सुध्दा झालेले आहे. परंतु शेवटी या सगळया उत्पन्नाच्या बाजु आहे महानगरपालिकेच्या कारण सभागृहात बसलेले संपुर्ण ७५-८० नगरसेवक हे रोज येऊन आपल्याकडे हेच म्हणतील आमच्या वार्डात गटारी नाही, आमच्या वार्डात रस्ते नाही, आमच्या वार्डात पथदिवे नाही आमच्या वार्डात उजेड नाही. परंतु यांच्या या सर्व हाऊस पुर्ण करण्यासाठी निधी असेल तरच या सर्व गरजा भागविले जातील. म्हणुन याला गांभिर्याने घेणे खुप गरजेचे आहे. त्याच प्रमाणे जाहिरात कर शुल्क, जाहिरात कर शुल्क हे साधारणता भाग १ मध्ये महसुली जमा पान नं.५ वरती, सन २०१९-२० च्या अर्थ संकल्पाची तरतुद होती ५० लक्ष रुपये आणि दि.१२/०३/२०२० म्हणजे काल पर्यंत त्यांची वसुली झालेली आहे, रु.२१,६७,९२९/- म्हणजे वसुलीची टक्केवारी आहे. ४३% याचा जर आपण विचार कराल ताई, मागील आकडेवारीवर जर आपण नजर टाकाल तर सन २०१६-१७ मध्ये रु.४४,१२,७८५/- वसुल झालेले होते. सन २०१७-१८ मध्ये रु.३४,०२,२१०/- सन २०१८-१९ पर्यंत ३४,१८,३५९/- वसुल झालेले होते आपण या मागील ३ वर्षाचा वसुल पाहता आणि वसुलीचा प्रमाण निम्मे पेक्षा कमी आणि जाहितीचा ओघ हा पुर्वीपेक्षा शहरामध्ये जास्त दिसत आहे म्हणजे याचा अर्थ काय होतो की कोटेतरी अनधिकृतरित्या जाहिराती लावल्या जातात आणि मनपा आर्थिक उत्पन्न कमी होत जाते. वास्तव्यात बघितल तर जी सन २०१६-१७ मध्ये रु.४४ लक्ष होती ही साधारणता ६०-६५ लाखाने वाढायला पाहिजे होती. कारण युगच आता जाहिरातीच आहे जाहिराती शिवाय व्यवसाय होत नाही. जाहिरातीचा प्रमाण रस्त्यावर डोळयाने कमी दिसत नाही. परंतु उत्पन्न जे मनपाच्या खजिन्यात जे आहे ते कमी दिसुन येत. हा ही एक चिंतेचा विषय आहे. त्यानंतर अतिक्रमण टेंडर - हे हेड आहे पान क्र.१२ आणि अनु. क्र.१० सन २०१९-२० मध्ये अर्थ संकल्पात प्रशासनाने अपेक्षित उत्पन्न रु.१,७५,०००/- अपेक्षित धरलेले होते. आणि नोव्हेंबर आखेर वसुल झालं रु.४५,२९४/- म्हणजे टक्केवारीच प्रमाण आहे. २६% आता अपेक्षित हे अपेक्षित असत. त्याबद्दल वाद नाही. कारण तो एक अंदाज आहे की, इतक अपेक्षित आहे आपल्याला यायला पाहिजे. ते तंतोतन्त येईलच कधी हे कमी ही येऊ शकते कधी अपेक्षेपेक्षा जास्त ही येऊ शकते. जसे पाऊसाचे अंदाज असतात तसे अंदाजपत्रकाचे हे अंदाज आहे. परंतु पुरवण्या पाहुन जर आपण विचार केला. तर सन २०१६-१७ ला त्यामधल उत्पन्न प्राप्त झालेल होते रु.१,०७,४४२/- सन २०१७-१८ मध्ये उत्पन्न प्राप्त झालेल होत रु.१,४०,८६३/- आणि सन २०१८-१९ मध्ये रु.१,५०,०४४/- म्हणजे या तिन वर्षाचा आपण आलेख बघाल तर प्रत्यक वर्षाला त्याच्या मध्ये वाढ होत गेलेली आहे. आणि ही वाढ झालेली आहे त्यापेक्षा अधिक वाढ या आता व्हायला पाहिजे होती. कारण

आज आपण बघाल तर शहरातला एक ही भाग अतिक्रमण विरहीत आहे असे दिसणार नाही. शहर वाढलेल आहे रस्ते वाढलेले आहे. म्हणजे अतिक्रमण ही वाढलेल आहे. म्हणजे साधारणता दुपटीने चारपटीने वाढायला पाहिजे होत. मुंढे साहेब आपण या बाबत खुप प्रामाणिकपणे काम करत आहे. हा आरोप नाही. तुम्ही तुमची कामगीरी करत आहे योग्य प्रकारे करत आहे अतिक्रमण निर्मुलन करण्याच्या संदर्भात परंतु उत्पन्न त्याच्यातले जे आहे. ते उत्पन्न घसरत चालले आहे. हेड मोठा नाही. छोटा हेड आहे. लाख दोन लाखाचा प्रश्न नाही. परंतु एक म्हण आहे. थेंबे थेंबे तळे साठे. अश्याच पध्दतीने कुटुन कुटुन आपण निधी वाचुन तो शेवटी या अर्थ संकल्पातल्या विकास योजना पुर्ण करण्याच्या संदर्भात हातभार लावु. दुसरी गोष्ट शहरामध्ये शिस्त ही लागेल. उत्पन्नात वाढ नाही झाली याचा अर्थ काय झाल. कुठेतरी प्रशासनाचा अंकुश दंडात्मक कार्यवाहीचा बडगा हा मॅनेज झालेला दिसुन येतो. आपल्याला त्याच कारणाने आपल्याला संपुर्ण शहरात अतिक्रमण निर्मुलन मोहिम राबविणे मध्ये आपली मनपाची एनर्जी खर्च करण्यामध्ये खुप वेळ जातो. एक हेड आहे रस्ते नुकसान भरपाई. पान क्र.१३ अ.क्र.२८ या हेड मध्ये सन २०१९-२० मध्ये अपेक्षित उत्पन्न ८० लक्ष गृहीत धरले होते. आणि ३० नोव्हेंबर अखेर उत्पन्न रु.४०,०८०/- प्राप्त झालेले आहे. रु.८० लाख च्या अपेक्षेत रु.४०,०८०/- उत्पन्न प्राप्त झाल्याने म्हणजे ०.५०% वसुली या हेड मध्ये झालेली आहे. आता याचा ही मागचा इतिहास जर बघितला आपण तर सन २०१६-१७ मध्ये या ठिकाणी उत्पन्न मिळालेल होत रु.२,३४,०९,२९३/- सन २०१७-१८ मध्ये उत्पन्न मिळालेल होत रु.१,२८,७५,९००/- आणि सन २०१८-१९ मध्ये उत्पन्न होत रु.१,०८,८३,७६०/- म्हणजे गेल्या वर्षाचे तुलने मध्ये सुध्दा १ कोटीच तुलनेत ४०,०००/- भोळे साहेब मला वाटते हे उत्पन्न खड्डे खोदणे, केबल टाकणे याच्या संदर्भात आहे. एका स्थायी समितीच्या सभेत चर्चा ही झालेली होती. काही कंपन्या विनापरवानगी रस्ते खोदत असतांना कुठेतरी कानावर पडलेल होत.

**मा.सभापती :-** स्थायी समिती सभेत हा विषय मीच निदर्शनात आणुन दिला होता. पिंप्राळयात रस्ता खोदला जात होता तेथील जे इंजिनिअर आहे त्यांना सुध्दा याबाबत काही कल्पना नव्हती. रस्त्याच खोदकाम सुरु होत त्यावेळेला त्यांना विचारणा करण्यात आलेली होती. त्यावेळेस मी प्रशासनाच्या लक्षात आणुन दिल होत की, येथे आपला महसुल बुडत आहे. विना परवानग्या किंवा ऑफ द रेकॉर्ड परवानगी घेऊन हे जे काम चालु आहे. त्यामुळे हे उत्पन्न बुडत होत.

**श्री.नितीन लढढा :-** त्यांना वाटल असेल की, रस्ते पहिलेच खोदलेले आहे त्यात आपणही आपली केबल टाकुन दिली तर त्यात हरकत काय ? आपण रस्ता तर काही खराब करत नाही खराब रस्त्यातच आपली केबल टाकत आहे. त्यामुळे कदाचित मक्तेदाराची ती माणसीकता झाली असेल. महापालिकेची परवानगीची गरज नाही आणि पैसे द्यायची ही गरज नाही. परंतु गंभिर बाब आहे की, जेथे १-१ व २-२ कोटी रुपये उत्पन्न वसुल झालेले आहे. तेथे फक्त रु.४०,०००/- उत्पन्न येत गंभीर बाब आहे. पान क्र.१० आणि अ.क्र.१६ अग्निशमन सेवा दाखले शुल्क सन २०१९-२० ची अपेक्षित तरतुद ७ लाख रुपये होती. आणि ३० नोव्हेंबर आखेर उत्पन्न शुन्य. याचा ही मागचा इतिहास जर बघितला ताई. तर सन २०१६-१७ मध्ये रु.७,४४,१०८/- वसुल झालेले होते. सन २०१७-१८ मध्ये रु.३,३७,१८४/- जमा झालेले होते. आणि सन २०१८-१९ मध्ये रु.७,७८,१०८/- वसुल झालेले आहे. आणि आज हा वसुल शुन्य होऊन पडला आहे. हा कायदा संपुष्टात आला की, विभाग बंद झाला.

**श्री.शशिकांत बारी, अग्निशमन अधिकारी :-** सन्मा.सभागृह नोव्हेंबर पर्यंत वसुली रु.३,१५,६६७/- दाखविलेली आहे.

**श्री.नितीन लढढा :-** पण हे अर्थ संकल्पात नाही.

**मा.सभापती :-** आपण अर्थ विभागाला पाठविलेली नाही का की , ऐवढी वसुली आपण केलेली आहे.

**श्री.शशिकांत बारी, अग्निशमन अधिकारी :-** पाठविलेली आहे मॅडम

**श्री.कपील पवार, मुलेअ :-** यांनी जी आकडेवारी पाठविलेली आहे ती पुढील चारमाही मध्ये वसुल झालेली रक्कम आहे ही पुढच्या म्हणजे डिसेंबर , जानेवारीत जमा आहे आणि ती अर्थ विभागात वेगळया हेडला गेलेली आहे.

**श्री.नितीन लढढा :-** हरकत नाही पण ती येथे दिसत नाही म्हणुन विचारले

**श्री.कपील पवार, मुलेअ :-** ती अर्थ विभागात वेगळया हेडला गेलेली आहे व आपण ती वेगळया हेड मध्ये दाखविलेली आहे.

**श्री.नितीन लढढा :-** गाळे हस्तांतरण शुल्क पान क्र.११ अनु.क्र.१० सन २०१९-२० ची अपेक्षित तरतुद रु.१० लक्ष आणि उत्पन्न शुन्य. सन २०१७-१८ ला याच्यामध्ये रु.१६,२०,०००/- उत्पन्न झालेले आहे. या संदर्भात ताई साधारणता आपण सभापती असेल किंवा आपण सदस्य होते या सभागृहात अनेक वेळेला मी या प्रश्नावर बोललेलो आहे. परंतु प्रशासन गांभिर्याने का घेत नाही या गोष्टी. आज या गोलाणी मार्केट मध्ये साधारण हस्तांतरण झालेले ज्या आपण म्युचवल अंडरस्टँडीग म्हणतो. आपसी विश्वासात झालेले हस्तांतरणाचे केसेस जवळपास ३०० ते ४०० असतील. आणि त्याच्यामधुन साधारणता ४ ते ५ कोटी रुपये महसुल हा महानगरपालिकेला मिळु शकतो या मागच्या अर्थ संकल्पाच्या वेळीही सुचना केल्या होत्या परंतु संपुर्ण वर्ष गेल याच्या संदर्भात प्रशासनाने अद्यापपावेतो प्रस्ताव ही पाठविलेला नाही. अश्या पध्दतीने जे महसुलीचे बाजु आहे आपल्या आणि त्याच्याकडेच जर आपल दुर्लक्ष होत असेल. मग ही महापालिका चालवायची कशी. हे जे नियोजन केलेल आहे या नियोजनाला न्याय देणार कसा. ५-५ कोटी रुपये हे मोठया गोष्टी आहे. आणि लोक स्वईच्छेने द्यायला तयार आहे. म्हणजे आपल्या पेक्षा ते गाळे धारकांना चिंता लागलेली आहे की तुम्ही तरतुद करा आणि एक रिझनेबल प्रपोझल द्या. आम्ही तातडीने सगळे एका

City of Jalgaon लेखा गाव

दिवशीच पैसे भरायला तयार आहे. म्हणजे जे आपण म्हणतो की, लक्ष्मी येत आहे पण आपण दरवाजे बंद करुन बसलेले आहे. अशी परिस्थिती दिसुन येते. अनधिकृत ज्या पध्दतीने लोकांनी एक दुकान चे दोन दुकाने करुन घेतल्या. मधल्या भिंती काढुन घेतल्या. काहींनी भिंती काढुन शटर लावुन घेतल्या. हेच मी मुटे साहेबांना १५ दिवसापुर्वी बोललो होतो. या पध्दतीने ताई मागच्या काळामध्ये यांच मुल्य मापन करुन जी भिंत त्यानी काढली असेल त्या भिंतीला लागणारा खर्च भविष्यात महानगरपालिकेला किती आहे. याच मुल्यमापन करुन आपण ती रक्कम मनपा खजिन्यात भरुन घ्यायचो. आणि रितसर त्याला परवानगी द्यायचो. शेवटी व्यवसायाची रुंदी होत असेल त्याची गरज ही आहे. आणि त्याच्यामध्ये जर काही आपल्या बिल्डींगच्या स्ट्रक्चरला धोका होणार नाही. या कंडीशनवर आपण परवानग्या द्यायचो. साधारणता ४० ते ५० हजार रुपये वर्षात आपण दुकानदाराकडुन वसुल करायचो. त्या पध्दतीत ज्या रकमा असेल, काय होईल बघा. सदस्य येथे बोलतील कोणीही व्यक्ती येथे तक्रार करेल. व्यवसायात काय असत. बाजुच्या दुकानदाराच पोट दुखत आणि तो तक्रार करतो की, यानी भिंत काढुन घेतलेली आहे. ठिक आहे त्याने अर्ज दिला होता महापालिकेत, महानगरपालिकेने परवानगी दिली नाही. जरी ही बेकायदेशीर असेल परंतु ते कायदेशीर करता येऊ शकतो. कायदेशीर केल्यानंतर जर महानगरपालिकेच्या महसुलामध्ये जर काही वाढ होत असेल आणि त्याला सुध्दा दिलासा मिळत असेल. ती विन विन सिच्युएशन आहे असे प्रकरण तातडीने राबवुन महानगरपालिकेच्या तिजोरीत पैसा कसा जास्त आणता येईल हा सुध्दा तातडीने विचार करणे गरजेचे आहे. मनपा प्राथमिक शिक्षण मंडळ सन २०१९-२० ला तरतुद ही फार पुर्वी पासुन वाढत आलेली आहे आणि तीच कन्टीन्यु कॅरी फॉरवर्ड होते. त्या संदर्भात आपण मनपा शिक्षण मंडळ महानगरपालिकेच्या ज्या शाळा चालवतो त्या शाळेच्या भाडेपोटी राज्य शासनाकडुन आपल्याला अनुदान प्राप्त होत. परंतु गेल्या कित्येक वर्षापासुन या सदंर्भातल भाड्याच अनुदान मनपाला प्राप्त झालेल नाही. आणि त्याची रक्कम जी आहे ती १०,८८,२७०००/-. आता वास्तवीक बघितल तर या शासन दरबारी या सर्व गोष्टींचा सुध्दा पाठपुरावा करु. या रकमा महानगरपालिकेला कश्या प्राप्त होतील याचे प्रयत्न होणे खुप गरजेचे आहे. आता एक बघा, नविन संडास व मुत्र्या पेज क्र.३७ भांडवली खर्च - या हेड वरती तरतुद केलेली होती ३ कोटी रुपये. आता एक आठ दिवसापुर्वीचा प्रश्न आहे ताई की, वैशालीताई विसपुते आणि महिला प्रसाधनगृहाच्या संदर्भात आपण ही त्यांच्या सोबत होत्या आदरणीय महापौरताई त्यांच्या सोबत होत्या. आपण तो निर्णय घेतला की, सार्वजनिक ठिकाणी जे मॉल्स असतील, पेट्रोल पंप असतील, हॉटेल्स असतील तेथील प्रसाधनगृह नागरीकांना किंवा महिलांना उपलब्ध करुन द्यावे. परंतु ताई आश्चर्य या गोष्टीच वाटत की, ३ कोटी रुपयांची तरतुद मागील अर्थ संकल्पात म्हणजे या संपणाऱ्या आर्थिक वर्षामध्ये ३ कोटी रुपयांची तरतुद नविन संडास व मुत्र्या याच्यासाठी तरतुद असतांना सुध्दा याच्यामध्ये १ रुपया खर्च झाला नाही. म्हणजे आपल्या अधिकार क्षेत्रात, आपल्याकडे पैसा आहे आपल्याकडे तरतुद आहे. आणि आपण दुसऱ्यांच्या दालनात भिक मागायची, मॉल्स ला विनंती करायची की, तुम्हाला हे उघडुन द्याव लागेल. पेट्रोल पंप वाल्यांना सांगाव लागेल की, तुम्हाला हे उघडुन द्यावे लागेल, ठिक आहे, तो भाग वेगळा आहे त्याच्यासाठी प्रयत्न केले ते काही वाईट नाही ते प्रयत्नही चांगलेच आहे. परंतु ज्या शहरामध्ये आपल्या हातात व्यवस्था असतांना आपण दुसऱ्याकडे जाव, तरतुद असतांना सुध्दा निधी असतांना सुध्दा, परंतु तरतुद आहे आणि निधी नाही तरी ही समजु शकलो असतो. एक वेळ, म्हणजे माजी महापौर मॅडमांच एक स्टेटमेंट पाहत होतो मी की, महिलांच्या प्रसाधनगृहासाठी प्रयत्न करा. म्हणजे ज्या वेळेला ते विराजमान झाले असतील, त्यांनी एखादी मुलाकात दिली असेल. परंतु काय होत कुठेतरी आपण त्या उत्साह मध्ये काही योजना काढतो. परंतु त्याची अंमलबजावणी होते की नाही होते. त्याच मात्र आपल्याला भान राहत नाही. तर अश्या पध्दतीने तरतुद असतांना आपण प्रसाधनगृह उभारु शकत नाही. ही अत्यंत शोकांतीका आहे.

**मा.सभापती :-** सभापती पद स्विकारतांना सगळयात प्रमुख मुद्दा हाच होता की, जळगांव शहरामध्ये महिलेंसाठी स्वच्छतागृह उपलब्ध करुन देणे, या बाबतीत मागच्या ३ महिन्यापासुन मी ऑनपेपर काम सुरु केलेल आहे. आपल्या माहितीसाठी मी सांगते याच्यापुर्वी मी सभागृहात सांगितलेल आहे. कदाचित आपण काही सभांना न-होतात. कदाचित आपल्याला माहिती नसेल की, आपण आरोग्य विभाग, बांधकाम विभाग, नगररचना विभाग या सगळयांना एकत्रीत सोबत घेऊन जळगांवच्या मध्यवर्ती टिकाणी १३ ते १७ स्पॉट फाईंडआऊट केलेली आहे. जेथे आपण स्वच्छतागृह उभारु शकतो. आणि स्वंयसेवी संस्था आपल्याकडे स्वतःहुन आलेल्या आहेत. स्वच्छतागृह बांधुन देऊन पध्दतशीर चालविण्यासाठी.

**श्री.नितीन लढढा :-** मी म्हणतो, काही संस्था जे असतात की, फक्त आपण ग्रेट आहात म्हणुन आपण ती जबाबदारी कस तरी पध्दतीने पार पाडुन द्यायची. कारण शौचालय जर चांगल्या पध्दतीच असेल जस आपण मुंबईला पाहतो. सुलभ शौचालय अत्यंत चांगल्या पध्दतीने बांधलेल असत चांगल्या पध्दतीने मेनटेन असत. आज आपण महानगरपालिकेच्या शौचालयांची अवस्था पाहतो. आज तुम्ही त्याच उदघाटन करा आणि १५ व्या दिवशी तुम्ही तेथे पाय ठेवुन बघा. नाही पाय ठेऊ शकणार. या धरतीने जर बनवायची असेल तर या कॅलीटीने बनवा की, जाणाऱ्यालाही वाटायला पाहिजे की, हे स्वच्छता गृह आहे. आहे त्याच धरतीवर ती टिकायला पाहिजे. नाही तर काय होईल ते १५ दिवस महिना दोन महिना ते सुस्थितीत राहील. त्यानंतर काय होईल की, नागरीक त्या शौचालयाच्या बाहेर लघुशंकेला बसतील. मला अस वाटत आपण जर कधी म्हणाल तर सुप्रिम

इंडस्ट्रीजचे मालक महावीर प्रशांतजी तापडीया यांच्याशी हे हेड बघितल्यानंतर की, हेड आहे पण तरतुद नाही. किंवा खर्च करायला मानसिकता नसेल महानगरपालिकेला तर त्यांच्याशी बोललो मी, ज्या प्रमाणे तुम्ही आमच्या विनंतीला मान देऊन साधारणता काही त्या शौचालयाला ४० लक्ष रुपये खर्च आलेला आहे. आणि त्या धरतीवरती तुम्ही आम्हाला २-३ शौचालय जेणे करुन त्याच्यामध्ये लेडीज सुविधा राहिल आणि जेन्टस सुविधा राहिल आणि डब्ल्यु.सी. पण. अश्या पध्दतीने जर म्हणाल तर त्याना पाचरण करतो आणि मागच्या वेळेला जेव्हा हे शौचालय बांधल गेल होत. याच सोबत आम्ही एक स्पॉट फायनल केला होता पोलीस मल्टी पर्पज हॉलच्या बाहेरचा.

**मा.सभापती :-** या यादीत सुध्दा तो स्पॉट आहे.

**श्री.नितीन लढढा :-** जर आपण म्हणत असाल तर मी त्यांना चार दिवसात बोलवतो किंवा त्यांचे प्रतिनिधींना, आणि याच कंडीशनवरती ज्या पध्दतीने ही उभारनी झालेली आहे. कुठेतरी एक मॉडेल म्हणुन आपण हे करायला पाहिजे. नाही तर फक्त २-५ लाख रुपये देऊन कोणीही साधारण शौचालय बांधुन देईल. काही दिवस तेथे गरज भागेल परंतु ते लॉगटर्म राहणार नाही. तर याच्या बद्दलही आपण विचार करावा.आता एक विनंती आहे ताई की, मागच्या वर्षी घनकचरा व्यवस्थापन या नांवा खाली आपण २% अतिरिक्त कराची आकारणी केलेली होती. आणि त्याच्यातुन साधारणता रहिवासी करदातांकडुन १,७२,६०,००० आणि अरहिवासी करदात्यांकडुन १,२६,७०,०००/- अश्या पध्दतीने एकुण २,९९,३०,०००/- रक्कम आता याला शब्द थोडे कडु वाटतील की, या २% कर आकारणीत आपण त्यांना लुबाडण्याचा प्रयत्न केलेला आहे. कारण ही परिस्थिती तुम्ही नाकारु शकणार नाही, मी नाकारु शकणार नाही प्रशासन नाकारु शकणार नाही, सभागृहातील कुठला सदस्य नाकारु शकणार नाही. की, कुटलीही अतिरिक्त सुविधा न देता, उलट वृत्तपत्रातील रकाने, हाफपेज पर्यंत आज जर तुम्ही लोकमत उघडुन बघाल तर आज माझाच प्रभाग आहे, माझ्या प्रभागामध्ये कचरा साटलेला आहे मला त्याच वाईट वाटत नाही की, वृत्तपत्राने माझाच प्रभाग का छापला, परंतु दुख या गोष्टीच वाटतं की ज्या प्रभागामध्ये महानगरपालिकेची प्रशासकीय इमारत आहे. आणि नविपेठ जो हा परिसर आहे. याच सुध्दा नांव नवीपेठच आहे, आणि लोकमतच संपुर्ण आर्धा पान भरलेला आहे ते नवीपेठ परिसराचाच आहे. याच्यामुळे या प्रशासकीय इमारतीचे धिंडवडे निघतात. अश्या पध्दतीने प्रशासकीय इमारतीच्या परिसरात अशी परिस्थिती असेल, तर तांबापुरा मध्ये काय असेल, हरिविठ्ठल नगरमध्ये काय असेल, संमता नगर मध्ये काय असेल, पिंप्राळयामध्ये काय असेल याची कल्पना जरी केली की, जेथे संपुर्ण शहरावरती नियंत्रण टेवणारी प्रशासकीय व्यवस्था ज्या एका टिकाणी बसते, तेथे अशी परिस्थिती असेल तर इतर शहरामध्ये परिस्थिती किती गंभिर असेल. आज जवळपास आपण एक महिन्यापासुन पाहतोय. एक महिन्यामध्ये परिस्थिती थोडी गंभिर झालेली आहे. गेल्या ६ महिन्यापासुन आणि ज्या दिवसापासुन हा स्वच्छताचा मक्ता देण्यात आला, त्या पहिल्या दिवसापासुन आजपर्यंत एकही स्थायी समितीची सभा म्हणा किंवा एक ही महासभा म्हणा, या आरोग्याच्या, मक्तेदाराच्या आणि शहराच्या स्वच्छतेच्या विषयांच्या चर्चा न होता पुर्ण झालेली असेल अस जाणवत नाही. खुप गंभिर बाब आहे मला कळत नाही. गंभिर कोण नाही, गंभिर सगळेच दिसतात पण निर्णय का होत नाही. आता सभागृहामध्ये आल्या बरोबर एक वेगळीच माहिती मिळाली की, मक्तेदार उच्च न्यायालयात गेलेला आहे. म्हणजे हे तर असे झाले, उलटा चोर कोतवाल को डांटे. मक्तेदार न्यायालयात जातो आणि माझा मक्ता रद्द करण्यात येऊ नये अशी याचिका दाखल करतो. आणि आम्ही तुम्ही या सभागृहामध्ये घसे कोरडे करुन करुन थकुन गेलो, तर ही अत्यंत गंभिर बाब आहे या शहराच्या दृष्टीकोणातुन, आणि याच्यामुळे हे जे २% अतिरिक्त कर आपण लावलेला आहे. आणि आमची ही मागणी त्यावेळेला ही होती. मागील अर्थ संकल्पास मान्यता देण्यापुर्वी या विषयांवर त्या वेळेलाही चर्चा झाली होती. आमचे म्हणणे तेच होते. आपण २% च्या ऐवजी ४% कर लावा. कर लावल्याबद्दल वाद नाही. परंतु कराच्या मोबदल्यामध्ये काही सुविधा तर द्या त्यांना. म्हणजे ज्या काही पुर्वी चालु असलेल्या सुविधा त्या सुविधांमध्ये अजुन दुविधा निर्माण झालेल्या आहे. आणि आपण नागरीकांकडुन कोणत्या तोंडाने कर मागायचा. म्हणजे ३-३ कोटी रुपये आपण असे लोकांच्या खिश्यातुन जबरदस्तीने काढायचे किंवा चेकींग करुन काढायचे याला काही अर्थ नाही हे काही योग्य नाही. तर माझी विनंती आहे की, ताई हा जो कर आहे जो पर्यंत संपुर्ण शहराच्या घनकचरा व्यवस्थापनाचा योग्य पध्दतीने नियोजन होत नाही तो पर्यंत हा कर माफ करण्यात यावा. ज्यावेळेला सर्व जळगांवचे नगरसेवक समाधानी असतील. नगरपालिकेच्या आरोग्यचे सेवा अत्यंत चांगल्या आणि दर्जेदार आणि प्रामाणिकपणे मिळत आहे. निश्चितपणे मी म्हणतो २ च्या ऐवजी ३% कर लावला तर शहराचे नागरीक मागे पुढे पाहणार नाही कर द्यायला. परंतु हे २% रद्द करण्याचा निर्णय घ्यावा ऐवढीच आमची आपल्याला कळकळीची विनंती राहील.

**मा.सभापती :-** सर्व सभागृहाची ही मागणी आहे की, हे २% कर रद्द करण्यात यावा कारण की, आपण हे सर्व सोईसुविधा देऊ शकलो नाही. तर प्रशासन म्हणुन आपली भुमिका स्पष्ट करावी की, आपल्याला हे अस मागे घेता येऊ शकत का ?प्रशासन म्हणुन आपली भुमिका आम्हाला सांगावी. संपुर्ण सभागृहाची संमती आहे फक्त प्रशासनाची भुमिका आपण या टिकाणी ऐकुन घेणे मला आवश्यक वाटत.

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य विभाग :-** आता जे खुलासा तुम्ही मागीतलेला आहे, त्यासाठी शासनाची काय काय गाईडलाईन्स आहे त्याची नस्ती मी मागविलेली आहे, ती आली की, मी त्याबाबतच आपल्याला स्पष्टीकरण देईल.

City of Jalgaon पालिका जळगाव

**श्री.नितीन लढढा :-** आपल्या या सर्व गोष्टी बोटावरती पाहिजे. ज्या वेळेला आपला कार्यकाळ होता त्यावेळेला प्रस्तावीत केलेला २% चा आकार आहे.

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य विभाग :-** मी येथे जोईंट झाल्याच्या आधीच हे आहे.

**श्री.नितीन लढढा :-** जवळपास ६ महिन्यापासुन आपण या शहराच्या आरोग्य विभागाचे उपायुक्त आहात. आणि घनकचरा व्यवस्थापनामध्ये आपला अनुभव खुप दांडगा आहे.

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य विभाग :-** हा जो विषय आहे मी यायच्या पुर्वीच झालेला आहे.

**श्री.नितीन लढढा :-** दंडवते साहेब, शासनाने सुचित केलेल असेल आणि त्या पध्दतीने आपण आकारलेल असेल. परंतु एक सांगा तुम्ही दुकानात गेलात, दुकानदाराने तुमच्याकडुन पैसे घेऊन घेतले तुम्हाला माल दिला नाही आणि परत पाठवुन दिल. तुम्ही मागणार की नाही त्याच्याशी,

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य विभाग :-** याच्या मध्ये शासनाचे जे गाईडलाईन्स आहे,

**श्री.नितीन लढढा :-** मला सांगा, आपण हा उपक्रम का राबवत आहे की, ज्या सेवेच्या अनुषंगाने हा कर लागलेला आहे, परंतु सेवा देणेच्या संदर्भातच आपण असमर्थ आहोत. तर मग कर कशाला घ्यायचा, ज्या दिवशी आपण सेवा देणेच्या संदर्भात आपण समर्थ होऊ, निश्चितपणे तेव्हा कर घेण्याचा अधिकार ही असेल आणि आम्ही सुध्दा नागरीकांना अपील करु शकतो, चांगल्या सुविधा आपल्याला मिळत आहे आणि त्या अनुषंगाने कर देणे तुम्हाला क्रमप्राप्त आहे.

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य विभाग :-** त्याच अनुषंगाने मी सांगतो की, हा जो शुल्क आहे, टॅक्स आहे तो लावण्या मागचा शासनाचा उद्देश काय आहे. तो आपल्याला शासनांच्या गाईडलाईन्स वरुन स्पष्ट होईल. ती नस्ती आली की, मी आपणास स्पष्टीकरण देईल.

**श्री.नितीन लढढा :-** दंडवते साहेब, आज परिस्थिती भयानक वाईट झालेली आहे, अर्थ संकल्पाशी संबंध नाही त्या गोष्टीचा, परंतु अर्थ संकल्पातुनच प्रोव्हीजन केलेलाच खर्च त्याच्यावरती खर्च होत असतो. म्हणजे ते अर्थ संकल्पाचा विषय पर्यायाने येतो. आणि त्या अनुषंगाने इतका कोटयावधी रुपये खर्च जळगांव शहर महानगरपालिका विकास कामांसाठी आर्थिक परिस्थितीचा त्रांगण या शहराच्या नागरीकांना दाखवत असतांना अश्या पध्दतीने कोटयावधी रुपयाचा खर्च करुन, जर शहर स्वच्छतेचा असा बोलबाला होत असेल. ताई मला एक क्लिप आठवते, संपुर्ण देशामध्ये कोरोना व्हायरसचा मोठया प्रमाणावरती प्रभाव झालेला आहे. नागरीक चिंतीत आहे. अश्या मध्ये एक क्लिप व्हायरल झालेली आहे आपल्या देशाचे मंत्री मा.ना.श्री.रामदास आठवले यांची, आणि त्या क्लिप मध्ये ते म्हणता आहे, कोरोना गो गो गो कोरोना गो मला वाटत, आपल्याला सर्व नागरीकांना रस्त्यावर जमा करुन सर्व पदाधिकाऱ्यांनी हेच सांगाव लागेल गो कचरा गो गो गो गो कचरा गो, गो वॉटरग्रेस गो गो गो गो, अश्या पध्दतीची भुमिका कदाचित आपल्याला घ्यावी लागेल. तेव्हा मला कुठेतरी वाटत की, वॉटरग्रेस ही जाईल आणि कचरा ही जाईल. हा विषय सन्मा.आमदार महोदय विधानसभेमध्ये चर्चा करतात म्हणजे त्यांच्या विषयास सुध्दा प्रशासन गांभिर्याने घेत नाही. त्यांच्या वक्तव्या वरुन दिसुन येत आहे. आता नगररचना विभागाच्या अनुषंगाने ताई जसे आपण बोललात. २०१९-२० या अर्थ संकल्पामध्ये उत्पन्न रु.८,८६,३१,०००/- अंदाजित उत्पन्न अपेक्षित होत. आणि आज अखेर दि.१२/०३/२०२० अखेर उत्पन्न प्राप्त झालेले आहे. रु.६,२४,२४,०२६/- या उत्पन्नाची टक्केवारी जर बघितली तर ७०% आहे. जस आपण बोललात की, सन २०१६-१७ ला उत्पन्न प्राप्त झाल होत, रु.७,९४,८१,०७०/- सन २०१७-१८ मध्ये उत्पन्न प्राप्त झालेल आहे रु.७,६०,९१,९८७/- आणि सन २०१८-१९ या कार्यकाळात रु.१४,८३,१०,१३३/- आणि आज अखेर रु.६,२४,२४,०२६/- उद्दिष्ट पुर्तता सुध्दा झालेली नाही. शहराचा मोठया प्रमाणावर विस्तार सुरु असतांना, परंतु नगररचना विभागाच्या उत्पन्नाचा आलेख हा खालती चाललेला आहे. याची जर सखोल माहिती घेतली, तर जितक उत्पन्न मनपाच्या खजिन्यामध्ये आला असेल. त्याच्या पेक्षा जास्त तेथे कार्यरत अधिकाऱ्यांच्या घरात गेलेल असेल. आणि अश्या पध्दतीने हे उत्पन्न कमी होण्याच कारण सांगतो आपल्याला, ज्या पध्दतीने मनामध्ये एक वेगळा विचार टेवुन त्या भागातील यंत्रणा काम करत असेल. तर त्यामुळे निश्चितपणे महानगरपालिकेच्या उत्पन्नावर परिणाम जाणवतील. त्याच कारण आहे ताई. ज्या वेळेला मी माझ्या घराची बांधकाम परवानगी घ्यायला नगररचना मध्ये जाईल. ५००/१०००/१५०० स्के.फु. घर असेल. आणि ज्या वेळेला मी त्याची परवानगी घ्यायला जाईल. आणि सातत्याने महिना दोन महिना माझी ससेहोलपट तेथे होईल. त्याच्यानंतर माझी माणसीकता काय होईल की, येथे चकरा मारुन येथे ज्या पध्दतीची वागणुक होते ज्या पध्दतीच्या मागण्या होतात. माझ्यासारख्या व्यक्तीला अशक्य आहे, आणि पर्यायाने मी माझे बांधकाम विना परवानगीने सुरु करुन टाकतो. आणि विना परवानगी बांधकाम सुरु केल्यानंतर साधारणता माझ घर वर्ष दोन वर्षात पुर्णत्वाला येत. मी महानगरपालिकेच्या माध्यमातुन त्याला घरपट्टीची आकारणी सुध्दा लावुन घेतो. मग मी निश्चिंत होऊन जातो की, मी महानगरपालिकेची घरपट्टी लावलेली आहे. मी महापालिकेची घरपट्टीची आकारणी भरतो आहे. मी कायदेशीर रित्या झालेलो आहे. या कारणामुळे महानगरपालिकेच्या मोठया रिव्हेन्यु वरती याचा परिणाम होतो. ज्या पध्दतीने आपण नेहमी म्हणतो की, खुला भुखंड, खुला भुखंड नाही सॉरी भुसंपादनाच्या बाबतीतला हा विषय आहे. आपण म्हणतो की, कोणी स्वईच्छेने टि.डी.आर. मागत असेल. तर टि.डी.आर. दिला

Corporation of the ... जळगाव शहर महानगरपालिका

जात नाही. दिला जातो तर खुप वेगळया पध्दतीने दिला जातो जर कधी जो कोणी मध्यस्त असेल. त्याची खरी मुक्ती झाले शिवाय टी.डी.आर. मिळत नाही. आणि तश्या पध्दतीमध्ये काळांतराने तो टि.डी.आर त्याला नाही मिळाला, तो कायद्याने महानगरपालिकेला १२७ ची नोटीस देतो. जी जमीन महानगरपालिकेला टी.डी.आर.च्या मोबदल्यामध्ये विनामुल्य मिळायला पाहिजे विनामुल्य मिळत होती फक्त कुठेतरी अडुन अर्थिक धोरणामुळे त्या पर्यायाने १२७ ची नोटीस भुसंपादनासाठी महानगरपालिकेला द्यावी लागते. भुसंपादनाचा मोबदला कोट्यावधी रुपयात जातो. महानगरपालिकेची परिस्थिती नसेल तर महानगरपालिका असमर्थता दर्शविते. आम्ही या संदर्भातला मोबदला देऊ शकत नाही. आणि कालांतराने तो उच्च न्यायालयात जातो. तेथे तो याचिका दाखल करतो की, महानगरपालिका माझ्या जमिनीच्या भुसंपादनाचा मोबदला ही देत नाही. आणि माझी जमिन आरक्षणासाठी अडकुन ठेवतो. आणि याच्यामध्ये अनेक प्रकरणांमध्ये निकाल झालेले आहे महानगरपालिकेच्या विरोधात आणि त्या जमिनीचे सुध्दा आरक्षण हे व्यपगत झालेले आहे.काय झाल की, महानगरपालिकेला विनामुल्य भेटणारी जमिन ती गेली त्याच्या वरती भेटणारा आरक्षण शाळेच असेल, प्लेग्राऊंडच असेल, उद्यानाच असेल भाजी मार्केटच असेल जे काही असेल ते आरक्षण ही व्यपगत झाल. पर्यायी जागाचा विकास होईल त्या विकासामध्ये त्या त्या भागातील या अडचणीमुळे या विकासापासुन वंचित राहतील. पर्यायाने आपण म्हणतो की शहरात कुठेच जागा नाही कुठेच जागा नाही, ग्राऊंड नाही. याच कारणामुळे ते व्यपगत होतात. आपण याच्यामध्ये अपेक्षित उत्पन्नाची वाढ गृहीत धरलेली आहे. पण मी आपल्याला लिहुन देतो आपण साधारणता नगररचना मध्ये आपण १० कोटीची वाढ अपेक्षित ठेवलेली आहे. मी म्हणतो जी प्रशासनाने प्रस्तावीत केलेली आहे. ती १००% पुर्ण झाली आपण प्रशासनाचे आभार मानुन घ्यायचे ताई. या १० कोटी रुपये वाढीचे अनुषंगाने जरी आपण प्रस्तावीत कराल. त्याची स्वप्नपुर्ती होण्याची शक्यता ही दुसर आहे. त्याच पध्दतीने मालमत्ता कराच्या संदर्भात परिस्थिती जवळपास तीच आहे. आता राहिला विषय आपण या बोगद्याच्या संदर्भात १० ते ११ कोटी रुपयांची तरतुद केलेली आहे. आता १० कोटीची तरतुद आता मला सांगा ताई शिवाजी नगरचा उड्डानपुल याला कार्यादेश देण्यात आलेला होता दि.०५/०३/२०१८ ला म्हणजे हे बोगद्याच्या अनुषंगाने आहे की, बोगद्याची गरज का पडत आहे. अस्तीत्वातील व्यवस्था कोसळली, कारण नविन निर्माण करायचा होता आनंदाची गोष्ट होती. परंतु कार्यादेशला दि.०५/०३/२०१८ ला अर्थात दि.१८/०२/२०१९ ला त्याच भुमिपुजन झाल. कामाची मुदत १८ महिने मक्तेदाराला कार्यादेश देतांना होती. साधारणता हा १८ महिन्यांचा कालावधी दि.०४/०९/२०१९ ला संपुष्टात आला. तद्नंतर पुन्हा ६ महिन्याची मुदतवाढ देण्यात आली. ती ६ महिन्याची मुदतवाढ आता दि.३१/०३/२०२० रोजी संपुष्टात येईल.म्हणजे आजच्या १५ दिवसानंतर ती मुदतवाढ ही संपुण जाईल. म्हणजे साधारणता २४ महिन्यांचा कालावधी पुर्ण झाल्यानंतर आज कामाची प्रगती तेथे ५०% पेक्षा ही कमी आहे. आणि ज्यामुळे हे १०-११ कोटी रुपयांचा प्रस्तावीत खर्चाची तरतुद करणेची गरज येथे येऊन पडलेली आहे. काम थांबविणेच कारण निव्वळ हे वेगवेगळया विभागांच काम होत. काही काम रेल्वे प्रशासनाकडे काही आर.ओ.बी.च काम पी.डब्ल्यु.डी. करते. ईलेक्ट्रीक पोल हटविणेच काम एम.एस.ई.बी. करत आहे. जरी मी म्हणतो हे तीन विभाग होते तर त्यात महानगरपालिकेची जबाबदारी खुप कमी होती.परंतु या शहराच्या विकासाच्या दृष्टीकोणातं या वेगवेगळे ऐजन्सीमध्ये समन्वय घडुन आणण्याच काम म्हणुन या शहराच्या महापौरांच हक्क आहे. या शहराच्या लोकप्रतिनिधींच सुध्दा हक्क आहे. जर कधी हे काम निर्धारीत वेळ १८ महिन्यात झाल असत. तर हे दि.०४/१०/२०१९ ला पुर्ण झाल असत. आणि जर पुर्ण झाल असत तर ही १०-११ कोटीची तरतुद करावी लागली नसती. आणि तरतुद केल्यानंतर ही हे सगळे येणाऱ्या पैश्यांवर अवलंबुन आहे. रेल्वे प्रशासन महानगरपालिकेकडं डिपॉझीट बेसीसवर काम करतो. ज्या दिवशी ११ कोटीचा धनादेश किंवा जे काही इस्टीमेट आहे ७ कोटीचा त्या धनादेशाची रक्कम स्विकारल्या नंतर त्यांच्या मक्तेदाराच्या माध्यमातुन ते काम करेल.वरच्या हाईटला रिस्ट्रीक्शन्स आहे. कारण वरतुन रेल्वे लाईन गेलेली आहे. बजरंग पुलाच्या बोगद्याच्या बाबतीत मी महापौर असतांना आम्ही घेतला निर्णय त्यात सुध्दा भरपुर टिका झाल्या. परंतु त्याच्या मध्ये महानगरपालिकेचा दोष नव्हता, महापालिका त्याच्यामध्ये ऐजन्सी सुध्दा नाही. महानगरपालिकेची जबाबदारी फक्त इतकीच होती की, महानगरपालिकेने त्यांच्याकडे पैसा डिपॉझीट करावा. त्यांचे जॉईनींग सुध्दा रेल्वेचे असतात आणि कॉटॅक्ट्रर सुध्दा रेल्वेचे असतात. अश्या परिस्थिती मध्ये येथे सुध्दा ती परिस्थिती संभावना येऊ शकते. कारण येथे ही बाजुने नाला गेलेला आहे. आणि नाला गेल्यामुळे त्या अंडरपलास्टला तशीच परिस्थिती निर्माण होईल. येथे पाणी फक्त पाऊसाच येत. म्हणुन पाऊसाचे ३-४ महिने जे असतात त्याचा परिणाम त्या बजरंग बोगद्यात होत. पण ८-९ महिने ते कोरड असत. जेथे प्रस्तावीत आपला बोगदा आहे तेथे लागुन नाला आहे. आणि त्या नाल्याचा प्रक्युलेशन या बोगद्यामध्ये १२ महिने सुध्दा होऊ शकत. त्यामुळे दोन गोष्टी एक तर आर्थिक तरतुद येणाऱ्या रुपयांवरती अवलंबुन आहे ते ही पुर्ण होईल त्याची मला त्या संदर्भात ही शास्वती नाही. अश्या पध्दतीने मी म्हणतो नविन याच्यावरती खर्च करण्यापेक्षा, खर्च करण्याचा अधिकार आपला आहे त्याच्यावर माझी हे नाही. त्याची कनेक्टीव्हीटी माझ्या प्रभागात ब्राम्हणसभेजवळ होत आहे त्याच्या बद्दल ही वाद नाही. परंतु हा जर वेळ आणि श्रम हे काम पुर्णत्वास नेण्याकडे जर कधी जास्त लक्ष दिल गेल तर ते काम तितक लवकर होईल. आणि शिवाजी नगर वासियांची व्यवस्थाही चांगल्या पध्दतीने होईल. आणि त्यांच जो मागणीचा हट्ट आहे त्यांना ही विचार करावा लागेल. याच अनुषंगाने ताई, समांतर रस्त्यांचा शहराचा खुप

City of Jalgaon लेका गाव

पुर्वीचा जिवाळयाचा विषय आहे. समांतर रस्त्यांची मागणी आज ती बाजुला पडलेली आहे. काम सुरु आहे पण तो समांतर रस्त्यांच नाही. अस्तीत्वातील रस्त्यांची विडथ वाढविण्याच काम सुरु आहे. संपुर्ण शहराच्या जनतेनी जी आंदोलन केली ती समांतर रस्त्यासाठी केली. जेणे करुन समांतर रस्त्यांवरुन वाहतुक सुरु होऊन या निष्पाप जिवांचे जे बळी जात आहे. ते थांबतील. त्या वेळेला नही या विभागाने अस सांगीतल होत की, आमच्याकडे अस्तीत्वात असलेला हायवे याची प्रीलॅण्ड ही सुध्दा आमच्या पझेशनला आहे. त्या जागेवरती आम्हाला काही गोष्टी शिफ्टींग करणे संदर्भात जास्त काही अडचणी नाही. ज्या थोडयाफार जे शिफ्टींग होत्या ते आपण केल्या आहे. आता विषय असा आहे की, समांतर रस्त्यांची मागणी आहेच पण त्याच काही भाग महानगरपालिकेकडे या अनुषंगाने येत. त्यावेळेच्या झालेल्या मिटींगच्या चर्चेमध्ये ज्या काही आपल्या ॲमिनीटी असतील तेथे, ड्रेनेज असेल, वॉटर सिस्टीमची लाईटस असतील. किंवा महानगरपालिकेच्या अनुषंगाने असलेले ईलेक्ट्रीक पोल, आता ईलेक्ट्रीक पोल जे आपले होते ते आपण रिमु केले. परंतु नही ने त्यावेळेला त्या प्रकरणात विद्युतीकरणाचा सुध्दा भाग घेतलेला होता. मध्यभागी विद्युतीकरणामुळे बोथसाईडला लाईट इफेक्ट मिळेल. परंतु नही च्या केंद्रीय विभागाने सांगितल की, ही लोकल ॲथॉरिटीची जबाबदारी आहे. लोकल ॲथॉरिटीची च्या अनुषंगाने मा.आमदार महोदयांनी त्या वेळेला चंद्रकांतदादा पालकमंत्री होते. आणि त्या वेळेला त्यांच्याकडे ही मागणी केलेली होती. आज जिल्हाधिकारी महोदय नाही, नाही तर त्यांच्याशीच चर्चा करण्याची संदर्भातली ही भुमिका होती. आता काम खुप जोरात प्रगती पथावर आहे हायवेच विस्तारीकरण करण्याच. आता पुढच्या ३-४ महिन्यामध्ये नहीच काम पुर्णत्वास जाईल. परंतु विद्युत व्यवस्थेच्या संदर्भातली भुमिका जी आहे ती अजुन ही आंधारात आहे. मी बाबा साळुंखेंशी मागच्या आठवडयात माहिती घेतली. परंतु निधीच कोंडवाकोंडवी आहे. निधी नियोजन मंडळांकडुन घ्यायच की, मनपाने तरतुद करायची हे खुप तातडीने करणे गरजेच आहे. कारण रात्रीच्या वेळेला प्रचंड आंधार असतो. महानगरपालिकेच्या हद्दीत लावलेले आपण सर्व स्ट्रिट लाईट रिमुव्ह करुन टाकलेले आहे. थेट गिरणा पासुन तर कालिका माता मंदिरापर्यंत रिमुव्ह करुन टाकलेले आहे. आज परिस्थिती भयावह आहे. उद्या रुंदी वाढेल, गाडयांच तसा वेग ही वाढेल, आणि त्या वाढत्या वेगामध्ये पुन्हा ते अपघातांची मालिका जी आहे ती सुरुच राहील. तर ते पथदिव्यांच्या बाबतीत आपण काय नियोजन अर्थ संकल्पात केलेल असेल ती एक चर्चा होणे अपेक्षित आहे. आणि महानगरपालिकेच्या युटीलिटीच्या संदर्भात नहीशी पत्र व्यवहार करुन काय अपेक्षित आहे त्यांना आपल्या युटीलिटी शिफ्टींग करण्याच्या जेणे करुन दुसऱ्या टप्याच समांतर रस्त्याच काम हे अजुन लांबीवर पडायला नको. मी सिंहा साहेबांशी परवा बोललो, ते म्हणले की, तुमच्या जबाबदाऱ्या तुम्ही पार पाडा आमच्या जबाबदाऱ्या आम्ही पार पाडु. त्यांची भुमिका त्याच्या जागी योग्य आहे. त्या संदर्भात अर्थसंकल्पात आपण काय प्रोव्हीजन ठेवले असतील, नसतील ठेवलेले तर त्याच्या पर्यायाने प्रोव्हीजन ठेवा, जर कधी तिकडं मिळाले नियोजन मंडळाकडुन आनंदाची गोष्ट आहे. नाही मिळाले तर कमीतकमी आपल्या निधीतुन त्याची व्यवस्था करणे गरजेच आहे.

**श्री.मिनीनाथ दंडवते , उपायुक्त, आरोग्य :-** याच्यामध्ये नागरीकांकडुन वसुल केला जाणारा जो प्रॉपर्टी टॅक्स आहे त्याच्यामध्ये २ टक्के रहिवासी साठी आणि व्यवसायासाठी ४ टक्के त्याची आकारणी करण्यात येते यामध्ये पाणी पुरवठा आणि बांधकाम विभागाच्या २०१२ च्या गाईड लाईन्स आहेत त्याच्यानंतर घनकचरा नियम २०१६ याच्यानुसार घनकचरा व्यवस्थापनाकरीता तयार केलेला जो डीपीआर आहे त्या डिपीआर ची जी कमिटी होती त्या कमिटीने व शासनाकडुन महापालिकेला घनकचरा व्यवस्थापनासाठी जे अर्थ साहाय्य पुरविलं जातं त्यामध्ये महापालिकेकडुनही काही हिस्सा त्यात दिला जातो त्यासाठी महापालिकेच्या हिश्याच्या रकमेसाठी हा अधिभार नागरीकांकडुन वसुल केला पाहीजे अशी उपाययोजना सुचविलेली आहे. त्या अनुषंगाने हे प्रपोजल मा.महासभेपुढे मान्यतेसाठी ठेवलेले होते ते २०१८ ला महासभेने मंजुर केलेले आहे आणि जानेवारी २०१९ चा मा.आयुक्त यांचा आदेश आहे की याप्रमाणे अंमलबजावणी केली जावी . त्या अनुषंगाने प्रभाग समिती निहाय हा २ टक्के व ४ टक्के चा जो अधिशुल्क आहे ती रक्कम त्यात वसुल करायची त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी झालेली आहे.

**श्री.नितीन लढढा :-** ते अश्या अनुषंगाने लावण्याच्या संदर्भातील चुक आहे , आणि साधारणता २०१६ पासुन तो आदेश निघालेला आहे. आज २०२० आहे २०१९ ला आकारणी केली आणि मागच्या वेळेस ज्यावेळी प्रशासनाने ती आकारणी करण्याच्या संदर्भात प्रस्तावित केले होते त्यावेळेला सुध्दा आम्ही विरोध केला होता विरोध हा माझा फक्त विरोधासाठी नव्हता की बेसिक ॲमएसडी प्रोव्हाईड करा आणि ॲमएसडी प्रोव्हाईड करून त्यानंतर तुम्ही सुरू करा तर आजही आमची मागणी तिचं आहे की घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प योग्य पध्दतीने सुरू होत नाही , शहरातील घनकचरा व्यवस्थापन योग्य पणे पार पडत नाही त्या हिशोबाने आपण हा भार नागरीकांच्या खिश्यावर टाकलेला आहे तो पर्यंत टाकायला नको पाहीजे .

**श्री.मिनीनाथ दंडवते , उपायुक्त, आरोग्य :-** याच्यामध्ये उद्देश असा आहे की . . .

**श्री.नितीन लढढा :-** साहेब मला उद्देश लक्षात आला की मनपा त्याच्यामध्ये लाभार्थ्याचा हिस्सा टाकेल पण आपण त्यांना कुठल्याच सुविधा न देता कुठल्या तोंडाने मागणी करायची , उद्या रस्त्याचा प्रश्न येईल आपल्याकडे येणारा शासनाचा कोटयावधी रूपयांचा निधी परत चालला जातो त्याच्यावर आपण लक्ष केंद्रींत करत नाहीत , मग सामान्य नागरीकांनाच हा उद्दीष्ट ठेवायचे डोळयांसमोर .

Municipal Corporation महानगरपालिका

**श्री.मिनीनाथ दंडवते , उपायुक्त, आरोग्य :-** याच्यामध्ये उद्देश मी आपणांस पुन्हा एकदा वाचुन दाखवतो हा महसुल जमा होत असल्याने. . .

**श्री.नितीन लढढा :-** साहेब सगळं बरोबर आहे त्याचा उद्देश . .

**श्री.मिनीनाथ दंडवते , उपायुक्त, आरोग्य :-** आपल्याला याच्यामध्ये काय आहे की आधी सुविधा द्यावी मग ती वसुली सुरू करावी.

**श्री.नितीन लढढा :-** बरोबर आहे.

**श्री.मिनीनाथ दंडवते , उपायुक्त, आरोग्य :-** परंतु मार्गदर्शक सुचना अश्या आहेत या डिपीआर मधील मार्गदर्शक सुचनेनुसार शहरातील नागरीकांना घनकचरा व्यवस्थापनाच्या सुविधा पुरविण्यासाठी व भविष्यात घनकचरा प्रकल्प सुरळीत कार्यान्वित ठेवण्यासाठी घनकचरा व्यवसथानाकरीता येणाऱ्या खर्चाच्या . .

**श्री.नितीन लढढा :-** थांबा साहेब एक मिनिटं घनकचरा व्यवस्थानाचा आदेश कधीचा आहे.

**श्री.मिनीनाथ दंडवते , उपायुक्त, आरोग्य :-** तो आदेश आहे १ मार्च २०१८ चा .

**श्री.नितीन लढढा :-** बरोबर आहे मग आता २०१८ ते आज २०२० जवळपास दोन वर्ष झाले आहे दोन वर्षात प्रकल्पही पुर्ण झाला नाही जर प्रकल्प कधी विहीत कालावधी मध्ये पुर्ण झाला असता निधीचा विनियोग झाला असता प्रकल्प उभारला गेला असता या शहराच्या कचऱ्याच्या समस्या मार्गी लागल्या असत्या आणि मग हे जे अतिरीक्त कर आहेत हे भरण्याच्या संदर्भात सकारात्मक असती परंतु आलं कुठेतरी अपयश आपल्याकडे निधीची उपलब्धता असतांना सुध्दा आपण ते वेळेमध्ये नियोजन करू शकत नाही . परंतु कुठेतरी शासनाचा आदेश दाखवुन नागरीकांवर कर लादणं हे मात्र आपण विसरत नाहीत.संपुर्ण घनकचरा प्रकल्पाचं अपयश कोणच्या माथी मारणार तुम्ही नागरीकांच्या डोक्यावर मारणार का ? आज मला सांगा त्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाजवळ राहणाऱ्या नागरीकांची अवस्था काय आहे . जिव मुठीत घेवुन ते नागरीक जगतात आणि आपण अतिरीक्त कराची मागणी करत राहायची म्हणजे न्यायही द्यायचा नाही त्यांना व्यवस्थाही द्यायची नाही आणि आपण प्रशासनाने लादलेल्या कराचं आपण समर्थन करण्यासाठी पुन्हा पुन्हा तेचं वाचन करून दाखवायचं ते वाचनाचं मलाही कळतं म्हणजे तुम्ही चुकताहेत अश्यातील भाग नाहीये . माझा मुद्दा हा आहे की आपण स्वच्छतेच्या नावाखाली या शहराचा पुरता बोजवारा उडालेला आहे . अश्या अवस्थेत त्या नागरीकांना कुठेतरी दिलासा देण्याचा एक छोटासा प्रयत्न आहे. आणि त्या संदर्भाने तुम्ही जर पुन्हा पुन्हा रिपीट करतं असालं तर मला वाटतं हे योग्य नाहीये म्हणजे आपण कुठेतरी या सामान्य जनतेला वेठीस धरतोय किंवा त्यांच्या सहनशिलतेचा अंत पाहतोय .

**मा.सभापती :-** या बाबींनंतर सगळयांच्या असे लक्षात आले आहे की भविष्यात हा प्रकल्प उभारला जाईल ते बरोबर आहे . आता महासभेने २०१८ मध्ये ठराव मंजुर केला. महासभेने मंजुर केला त्यावेळेला हे अपेक्षित ठरलेलं होतं की हा घनकचरा प्रकल्प हा पुर्ण करू आणि या सुविधा आपण नागरीकांना देवु शकु त्या अनुषंगाने आपण ही आकारणी केलेली आहे . परंतु आपण या प्रकल्पाच्या प्रत्यक्षात पुर्णत्वास या योजनेच्या जावु शकलेलो नाही किंवा जी वस्तुस्थिती आहे . आता मला फक्त एवढं सांगा की शासनाने हे मार्गदर्शन सुचवलेलं आहे कि अशी ही आकारणी करणे बंधनकारक केलेले आहे. बाईडींग आहे का ते ?

**श्री.मिनीनाथ दंडवते , उपायुक्त, आरोग्य :-** या मध्ये घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ च्या अनुषंगाने शासनाने जो डीपीआर मंजुर केलेला आहे . त्याच्यामध्ये आपल्याला ३० कोटी रूपयांची रक्कम मंजुर झालेली आहे. त्यामध्ये केंद्र शासन , राज्य शासन आणि महापालिकेचा काही हिस्सा यामध्ये अंतर्भुत आहे . या प्राप्त निधीमधुन महापालिकेने घनकचरा संकलन व वाहतुकी साठी जे ईन्फ्रास्ट्रक्चर आहे ते आपण त्याच्यातुन खरेदी केलेलं आहे. पुर्वी आपल्याकडे घंटागाडयांची कमतरता होती आपण त्यामधुन काही घंटागाडया खरेदी केलेल्या आहेत. वाहतुकीची पण काही वाहनं खरेदी केलेली आहे. व काही वाहने जी बंदिस्त आहेत ती खरेदी केलेली आहेत.आता यात दुसरे काय आहे की जे सिव्हिल वर्क आहे त्याच्यामध्ये ट्रान्सपोर्टेशन असेल आणि प्रोसेसिंग प्लॅन्ट असेल. प्रोसेसिंग प्लॅन्टची वर्क ऑर्डर झालेली आहे . ते माझ्या माहितीप्रमाणे कामही सुरू झालेलं आहे. आता एक बायोगॅस प्रोजेक्ट जो आहे तो आपला थोडासा पेंडींग आहे ईतर सर्व बाबी ज्या आहेत त्या आपण मार्गी लावलेल्या आहेत. काही मंजुर झालेले आहेत काही कामं सुरू झालेले आहेत. आता याच्यामध्ये ती जी कमिटी होती त्या सल्लागार कमिटीने काही मार्गदर्शन सुचना सुचविलेल्या आहेत आणि त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी महापालिकेवर दिलेली आहे. त्या अनुषंगाने प्रशासनाने मंजुरीसाठी प्रपोजल ठेवलं होतं शासनाच्या निर्देशानुसार त्याअनुषंगाने महासभेचा ठराव त्या पध्दतीने झालेला आहे व त्यानुसार अंमलबजावणी चे आदेश तत्कालीन आयुक्त साहेबांनी काढलेले आहेत.

**मा.सभापती :-** ठरावाची प्रत आता आपल्याकडे आहे का?

**श्री.मिनीनाथ दंडवते , उपायुक्त, आरोग्य :-** हो आहे १२ / २०१८ चा

City of Jalgaon

**श्री.नितीन लढढा :-** आणि तो ठराव जर मान्य झाला नसता तर काय झालं असतं शासनाने निधी दाबुन घेतला असता का ? शहरामध्ये चांगल्या पध्दतीने घनकचरा व्यवसथापन व्हावं या सभागृहातील सर्व सदस्यांची ईच्छा आहे , असेलही आणि त्या अनुषंगाने प्रशासनाने ठेवलेल्या प्रस्तावाचं सगळयांनी समर्थन ही केलं असेल. परंतु या अनुषंगाने या प्रकल्पासाठी निधी आपण घेतो आहे त्या प्रकल्पाच्या ठिकाणी त्या घनकचरा प्रकल्पाच्या अनुषंगाने आपण नागरीकांकडुन आपण कर घेतोय आणि घेतात पण विशेष साफसफाई कर घेतोय साफसफाई कर घेतोय ते कमी आहे अश्यातील काही भाग नाही . परंतु या अपेक्षेने या प्रस्तावाला मान्यता दिलेली असेल ती जर कधी किंबाहुन असेल ठराव होवुन जाईल परंतु स्थायी समितीने ती तरतुद आता अमान्य करावी आणि तसा धोरणात्मक प्रस्ताव महासभे समोर मान्यतेसाठी पाठवावा . महासभा पुन्हा त्यावर धोरणात्मक निर्णय घेवुन की जोपर्यंत घनकचरा प्रकल्प पुर्ण होतं नाही तोपर्यंत दोन टक्के व चार टक्कयांची जी तरतुद आहे ती लागु करण्यात येवु नये. ज्या दिवशी प्रकल्प पुर्णत्वाकडे जाईल. प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर प्रशासनाने या पध्दतीची तरतुद पुन्हा प्रस्तावित करावी ती मान्य करण्यात येईल.

**मा.सभापती :-** वाहुळे साहेबांना विचारू ईच्छिते की नितीन भाऊंची जी मागणी आहे त्यात टेक्नीकल काही अडचण येईल का ?

**श्री.वाहुळे, मुख्यलेखापरिक्षक :-** सन्मा.सभापती ,सन्मा.सभागृह घनकचरा व्यवस्थापनाच्या प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जी आपण आकारणी केलेली आहे. ती महानगरपालिकेने फक्त घनकचरा व्यवस्थापन हाच विषय याच्याशी निगडीत आहे. आणि आपल्याला जर भविष्यामध्ये या आव्हानाला तोंड द्यायचे असेल तर ही आकारणी करणं गरजेचं आहे. आपल्याकडे जो निधी यातुन निर्माण होणार आहे. तो घरगुती प्रयोजनार्थ फक्त २ टक्के वाढ आणि व्यवसायासाठी ४ टक्के आहे या पध्दतीने आपण घेतोय आणि तो घेणं गरजेचं आहे असं माझं वैयक्तीक मत आहे.

**श्री.नितीन लढढा :-** गरजेचं आहे बरोबर आहे आता याच्यामध्ये मला सांगा आजमितीस २०१८ ला निधी प्राप्त झाल्यानंतर प्रकल्प प्रभावीपणे प्रशासनाने अंमलबजावणी त्याची केली नाही. कालांतराने दोन वर्षात आता कुठेतरी थोडीफार सुरूवात झालेली आहे या प्रक्रीयेसाठी , त्या दोन वर्षाच्या कालावधीमध्ये निधी पडलेला असतांना निधी न वापरल्यामुळे जे काही डिएसआर असतील जे काही डिएसआर बदलले आणि त्याचा जो काही भुर्दंड आहे त्याची जबाबदारी कोण स्विकारणार . लावण , मागणं या सगळया गोष्टी सोईस्कर आहे प्रशासनाला परंतु प्रशासन ज्या अकार्यक्षम कार्यामुळे या प्रकल्पाला विलंब झाला असेल त्याच्यामुळे जर मग हा खर्च असेल आणि प्रकल्पाची कॉस्ट वाढुन तर मग त्या खर्चाची नुकसान भरपाई कोण करणारं. चुकीचा धोरणात्मक निर्णय सभागृहाने घेतला तर प्रशासन ऑडीट मध्ये शक काढुन त्या बाजुने मतदान करणाऱ्या नगरसेवकांकडुन वसुल करतात . परंतु प्रशासकीय चुकांमुळे प्रकल्प लांबला गेला निधी विहीत मुदतीत खर्च केला गेला नाही आणि त्याच्यानंतर नागरी कर वाढीला जबाबदार कोण याला कोणाला जबाबदार पकडलेले आहे प्रशासनाने की कोणाकडुन कचऱ्याची रिकव्हरी प्रशासनाने केलेली आहे का ? म्हणजे कठेतरी सामान्य नागरीकांना भरडले जाण्याचे एक धोरण ठरवलेलं दिसुन येतं असा त्याचा काहीतरी अर्थ निघतो . जो सामान्य माणुस मरमर करतो त्याला कुठल्याही सेवा देण्याच्या संदर्भात आपण कानावर हात ठेवतो . आपण निधीची अडचण भासवतो . हा १०० कोटी रूपयांचा निधी परत गेला का ? आता त्याच्या खोलात गेले तर वेगवेगळे फाटे फुटतील त्याला खोलात जायची गरज नाही . २५ कोटी मधील सुध्दा निधी परत गेला मागचा ५ ते ६ कोटी रूपये निधी अखर्चित राहीला १५/१६ चा निधी त्याचं नियोजन आपण अनेकवेळा केलेलं होतं , परंतु तो निधी सुध्दा परत गेला याच्या जबाबदाऱ्या कोणावर फीक्स केल्या जातील ? याच्याही जबाबदाऱ्या कुठेतरी फीक्स व्हायला पाहीजे ना ? त्याच्यात मुळात निधीची कमतरता , शासकीय निधी मिळतो तोही आपल्याला खर्च करता येत नाही . आपण कसा काय विकास साध्य करणार आहेत या शहराचा ? काय आहे फक्त कागदांवरच विकास , कागदांवरच आकडे जाताय ताईंची टर्म संपुन जाईल आमची टर्म संपुन जाईल ३ ते ४ वर्षानंतर आणि नागरीकांना काय देणार की आम्ही वृत्तपत्रात मोटमोटया बातम्या दिल्या होत्या , मोटे मोटे आकडे आले ते सर्वसामान्यांच्या डोक्यावरचे आकडे असतात. त्याला फक्त घरपट्टीचं बिल पडतं हातात की मागच्या वेळेला १० हजार होत आता यावेळेला ११ हजार होवुन गेले आहे.

**मा.सभापती :-** मला वाटतं की यामध्ये नितीनभाऊ आपण काही टेक्नीकली अडचण येणार आहे किंवा नाही आपण याच्यामध्ये प्रशासनाला अश्या सुचना देवुया की या विषयाचा प्रस्ताव आपण महासभेसमोर आणावा आणि मग आपण महासभेमध्ये याच्याबद्दल धोरणात्मक निर्णय घेवु व ते मान्य करू शकतो.

**श्री.नितीन लढढा :-** हो बरोबर आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मला बोलायचे आहे मागे जो ठराव झाला त्यावेळेस बोरोले साहेब होते प्रकल्प संदर्भात निधी परत जाईल त्याकरीता आपल्याला या ठरावाची आवश्यकता आहे तरी हा ठराव लवकरात लवकर करावा अशी त्यांचे शब्द आहेत. त्या वेळेला एक ठराव करून घेतलेला होता. आत्तापर्यंत दोन वर्ष झाले तो प्रकल्प चालु झाला नाहीये हे जे बोलताय

Corporation ज महा

नितीन भाऊ बरोबर बोलताय त्यावेळेला मी पण होतो सभेमध्ये निधी परत जाईल त्याची जबाबदारी प्रकल्प अधिकाऱ्यावर टाकावी

**मा.सभापती :-** प्रशासनाला सुचना आहे की याबाबतचा प्रस्ताव महासभेसमोर ठेवावा व मग आपण याचा निर्णय महासभेमध्ये घेवुया.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** आता नितीन भाऊंनी जे बोलले की तो टराव कॅन्सल करावा . तर तो कर बंधनकारक आहे का हे प्रशासनाने सांगीतलं पाहीजे .

**मा.सभापती :-** आपल्याला एक धोरणात्मक निर्णय घ्यायचा आहे आणि तो महासभेमध्ये ठेवुया तश्या प्रशासनाला सुचना दिल्या आहेत. अंदाजपत्रक जे होतं ते ११ कोटी ९३ लाखांच होतं आणि आता स्थायी समितीने जमा बाजुला एक वाढ जी वाढ केलेली आहे ती ५४.९० केलेली आहे आणि खर्च बाजु मध्ये १३८.५६ असे स्थायीचे अंदाजपत्रक हे १२९१ कोटी ७६ लाख .

**श्री.नितीन लढढा :-** ताई याच्यामध्ये समांतर रस्त्यामध्ये विद्युत विभागाची तरतुद केलेली नसेल तर ती करण्यात यावी.

**मा.सभापती :-** प्रशासनाने सांगावे.

**श्री.साळुंखे , विद्युत विभाग प्रमुख :-** तरतुद करण्यात आलेली आहे हा विषयझाला आहे , पालकमंत्र्यांशी पण बोलणे झाले आहे.

**मा.सभापती :-** पालकमंत्र्यांना भेटुन आम्ही स्वत: पत्र दिलेले आहे आणि सभापती म्हणुन माझं बोलणं सुरू आहे त्या निधीसाठी , तर आता स्थायीचं अंदाजपत्रक १२९१ कोटी ७६ लाख असल्याचे जाहीर करत आहे.

**नगरसचिव :-** भाऊ सर्वानुमते मंजुर आहे का ?

**श्री.नितीन लढढा :-** होय .

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २३८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव यांचे कडील पत्र क्र./जशमनपा/लेखा/८२३/२०१९-२०२० दि.०४/०२/२०२० अन्वये मा.आयुक्त सो., यांचेकडुन स्थायी समितीपुढे सादर होणारे सन २०१९-२०२० चे सुधारीत व सन २०२०-२०२१ चे मुळ अंदाजपत्रकासाठी जमा व खर्चाच्या अंदाजाचे विवरण सादर करणेंत आलेले आहेत. दि.११/०२/२०२० रोजी घेण्यात आलेली सभा अंदाजपत्रकातील जमा आणि खर्चाच्या प्रत्येक बाबीवर अभ्यास करणे तसेच विचार विनिमय करणेसाठी तहकूब करणेत आली होती. सदर तहकूब सभा दि.१३/०३/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात आली.

दरम्यानच्या काळात मा.आयुक्त यांनी सादर केलेल्या माहितीचा सखोल अभ्यास केला असता मा.आयुक्त यांनी जमा खर्चाच्या गोषवारा सादर करतांना मालमत्ता कर, नगररचना विभागाकडील मागणी, घरे / दुकाने / गाळे भाडे, गाळे हस्तांतरण शुल्क यातून प्राप्त होणारे अपेक्षीत उत्पन्न कमी धरण्यात आले आहे तसेच महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (रस्ते प्रकल्प) यासाठी शासनाकडून मिळणारे अनुदान न धरता अंदाजपत्रक तयार केल्याचे निदर्शनास आलेले आहे. परिणामी महसुली उत्पन्न कमी दर्शविलेमुळे व अनुदानाची रक्कम न दर्शविल्यामुळे खर्च बाजुला तरतुदी त्या अनुषंगाने अल्प प्रमाणात दर्शविण्यात आलेल्या आहेत. त्याचा परिणाम विकास कामावर होणार आहे.

यास्तव प्रत्यक्षात कमी प्रमाणात दर्शविण्यात आलेली मागणी सोबतच्या परिशिष्ठ "अ" मध्ये जमा बाजूस रक्कम रु.१६०,००,००,०००/- वाढ करुन सदरची वाढ लक्षात घेता खर्च बाजुला रक्कम रु.२४४,६६,००,०००/- ची वाढ करुन सोबतच्या परिशिष्ठ "अ" मध्ये नमूद केल्या प्रमाणे तरतूद करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**A)** हॉकर्स शुल्क जे २० रु. होते ते प्रशासनाने ३० रु.ने वाढवुन ५० रुपये अंदाजपत्रकात प्रस्तावित केले आहे ते अमान्य करण्यात येत आहे.

**B)** नगरसेवक निधी करिता प्रशासनाने ८० लाखांची तरतुद केलेली आहे म्हणजेच प्रति नगरसेवक १ लाख. सदर तरतुद वाढवुन ३ कोटी २० लाख करावे म्हणजेच प्रति नगरसेवक ५ लाख करणेत यावे. सदर निधीचे बँकेत स्वतंत्र खाते उघडण्यात यावे व ४ कोटी रुपये खात्यात जमा करण्यात यावे. सदर ४ कोटी इतरत्र कोठेही खर्च करु नये अगर वर्ग करु

नये व प्रत्येक नगरसेवक निहाय ५ लाख रकमेचा हिशोब ठेवण्यात यावा व यासाठी स्वतंत्र लेखाशिर्ष निर्माण करण्यात यावे. याबाबत प्रशासनाने त्वरीत कार्यवाही करावी.

**C)** नविन इमारती / फायर स्टेशन बांधणे वार्ड ऑफीस बांधणे व इतर करिता प्रशासकीय तरतुद १५ लाख केलेली आहे परंतू प्रभाग समिती कार्यालयांचे रुपांतर मिनी मनपात करणे आवश्यक असल्याने मनपातील केंद्रीकृत खुला भुखंड विभागाचे प्रभाग समिती निहाय विभागणी करणेत येवुन विकेंद्रीकरण करणेत यावे तसेच सार्व.बांधकाम विभाग, आरोग्य विभागा, स्वच्छता विभाग, लाईट विभाग व पाणी पुरवठा विभाग तसेच घरपट्टी विभाग, खुला भुखंड विभाग, अग्निशमन विभाग, अतिक्रमण विभाग इ.सर्व विभाग प्रभाग अधिकाऱ्यांच्या अधिपत्याखाली करण्यात यावे. यामूळे नागरीकांसाठी सोईचे होईल व सर्व सेवा त्यांना प्रभागातच मिळणे सहज

शक्य होईल. तसेच पिंप्राळा परिसरात मनपाचे अदयावत रुग्णालय नसल्याने व वाढलेली लोकसंख्या लक्षात घेता तेथे असे रुग्णालय असणे आवश्यक आहे. त्यासाठी सोमाणी मार्केटला पहिल्या मजल्यावर मनपाचे सुसज्ज रुग्णालय निर्माण करण्यात यावे. यासर्व बाबींचा विचार करता प्रभाग समिती कार्यालये व पिंप्राळा भागात मनपा रुग्णालय व इतर काही इमारतींसाठी एकत्रित तरतुद २५ कोटी ने वाढविण्यात येत आहे. तरी सदर लेखाशिर्षाखाली २५ कोटी १५ लाख तरतुद करण्यात यावी. किरकोळ वसुली विभागा अंतर्गत हॉकर्स कडील वसुली अनेक किरकोळ स्वरुपाच्या इतर वसुली व मोठया प्रमाणात होणारी गाळे भाडे वसुली सुध्दा अंतर्भुत करण्यात आलेली आहे. मात्र किरकोळ वसुली विभागांतर्गत फक्त किरकोळ वसुलीच ठेवण्यात यावी व गाळे भाडे वसुली व हस्तांतरण शुल्क यासाठी स्वतंत्र विभाग निर्माण करण्यात यावा व तो प्रभाग समितीला जोडण्यात यावा. याबाबत प्रशासनाने त्वरीत कार्यवाही करावी.

**D)** सार्वजनीक उदयाने – बगिचे सुशोभिकरण करणे कामी प्रशासनाने १ लक्ष तरतुद केलेली आहे त्यामध्ये ४ कोटी ९९ लक्ष वाढ करुन ती ५ कोटी करण्यात यावी. शिवाजी उदयान मेहरुण येथे जळगांव जिल्हा वैशिष्ठ दर्शन थिम पार्क, बॉटॅनिकल गार्डन, बटरफ्लाय गार्डन इत्यादी विकसीत करणेसाठी फस्ट फेज म्हणुन ५ कोटींची तरतुद करण्यात येत आहे. याबाबत प्रशासनाने त्वरीत कार्यवाही करावी.

**E)** वाघुर प्रकल्प तसेच इतर मनपा कार्यालयांचे लाईट बिल जास्त येत असल्यामुळे तसेच हरीत उर्जा संवर्धन या संकल्पनेस चालणा मिळावी म्हणुन मनपा प्रशासकीय इमारत व मनपाचे इतर सर्व इमारतीवर सोलर पॅनलची उभारणी कामी २ कोटीची तरतुद करण्यात येत आहे. तरी सोलर पॅनलची उभारणी करण्यात यावी. याबाबत प्रशासनाने त्वरीत कार्यवाही करावी.

**F)** संपुर्ण जळगांव शहरात दिशा दर्शविणारे फलक कुठेही दिसुन येत नाही. शहरातील वाहतुकीस शिस्त लागावी व शहराचे सौंदर्यात भर पडावी म्हणुन संपुर्ण शहरात दिशा दर्शक फलक व रस्ते सुरक्षा मार्गदर्शक फलक लावणे कामी २ कोटीची तरतुद करण्यात येत आहे. तरी या बाबत प्रशासनाने त्वरीत पुढील कार्यवाही करावी.

**G)** महानगरपालिका मालकीची रेडक्रॉस सोसायटी मागील जागा फायनल टी.पी. स्कीम II चा अंतीम भुखंड क्र.१६७(ब) क्षेत्र १४१२.२ चौ.मी. नुकतीच महानगरपालिकेने ताब्यात घेतली आहे. सदरची जागा विकसीत करुन तेथे मनपाचे भविष्यात उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण करणारी व्यवस्था निर्माण करणेसाठी सदर जागा विकसीत करणे पोटी २ कोटी खर्चाच. तरतुद करण्यात आलेली असुन प्रशासनाने त्वरीत सदर जागा विकसीत करण्याची कार्यवाही करावी.

**H)** परिशिष्ठ "अ" मधिल खर्च बाजूला अ.नं.२,१३ व २७ नुसार नविन लेखाशिर्षक अंदाजपत्रकात तयार करणेस मान्यता देण्यात येत आहे. याबाबत प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

प्रशासनाने, परिशिष्ठ "अ" मध्ये जमा व खर्च बाजूस केलेली वाढीव तरतुद लक्षात घेवुन अंदाजपत्रकात योग्य ती सुधारणा करुन सन २०१९-२० चे सुधारीत व सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक तयार करुन महासभा समोर मान्यतेसाठी तात्काळ सादर करावे. तसेच सदर ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेबाबत लेखा विभागाने संबंधित विभागांना त्वरीत कळवावे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते** :- १३ **प्रतिकुल मते** :- ००

**सुचक** :- **खडके सुनिल वामनराव**

**अनुमोदक** :- **काळे रेश्मा कुंदन**

## परिशिष्ट अ

### सन २०१९-२० चे सुधारीत व सन २०२०-२१ चे मुळ अंदाज पत्रक

### जमा बाजु

| अ.नं. | बजट हेड | लेखाशिर्ष | प्रशासन | म. स्थायी समिती | वाढ | पा.नं. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ-४ | मालमत्ता कर | ५३००००००० | ८००००००० | २७०००००० | ३ |
| २ | ब-२ | नगर रचना | ९००००००० | १९०००००० | १००००००० | ६ |
| ३ | क-३/२ | घरं दुकाने गाळा भाडे | ६६२५००० | १८६६१५००० | १८००००००० | ११ |
| ४ | क-३/१० | गाळा हस्तांतरण शुल्क | ० | ५०००००० | ५०००००० | ११ |
| ५ | | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (रस्ते प्रकल्प) | ० | १००००००००० | १००००००००० | |
| | | एकुण : | ६२६६२५००० | २२२६६१५००० | १६०००००००० | |

### खर्च बाजु

| अ.नं. | बजट हेड | लेखाशिर्ष | प्रशासन | म. स्थायी समिती | वाढ | पा.नं. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ-३/४ | मालमत्ता फेर मुल्यांकन खर्च / सर्वेक्षण | १०००००० | २०००००० | १०००००० | ३ |
| २ | ब-२/१७ | सोलर पॅनल उभारणी मनपा प्रशासकीय इमारत व मनपा इमारतीवरील (प्रस्तावीत हेड) | ० | २००००००० | २००००००० | ७ |
| ३ | क-१२/४ | स्मशानभुमी मोफत दहन / दफन | ८००००० | १०००००० | ९९००००० | १४ |
| ४ | क-१२/३ | स्मशानभुमी व्यवस्था दुरुस्ती | २००००० | ५०००००० | ४८००००० | १४ |
| ५ | क-१६ /२ | बालगंधर्व नाट्यगृह व्यवस्था दुरुस्ती | ० | ५०००००० | ५०००००० | १५ |
| ६ | क-१८/४ | बगीचे सुशोभिकरण करणे | १००००० | ५०१००००० | ५००००००० | १६ |
| ७ | क-१९/६ | इमारत व्यवस्था दुरुस्ती | १०००००० | १०००००० | ९०००००० | १७ |
| ८ | क-१९/८ | रस्ते व्यवस्था दुरुस्ती | ५०००००० | १५०००००० | १००००००० | १८ |
| ९ | क-१९/९ | गटार व्यवस्था दुरुस्ती | २०००००० | ६२०००००० | ६००००००० | १८ |
| १० | क-१९/११ | व्यपारी संकुल व्यवस्था दुरुस्ती | १०००००० | ५००००००० | ४००००००० | १९ |
| ११ | क-१९/१८ | तांत्रीक फी | ५०००००० | २०००००० | १५०००००० | २० |
| १२ | क-१९/२५ | नगर सेवक निधी | ८०००००० | ८००००००० | ३२०००००० | २१ |
| १३ | क-१९/२६ | संपुर्ण शहरात दिशा दर्शक व रस्ते मार्गदर्शक फलक लावणे (प्रस्तावीत हेड) | ० | २००००००० | २००००००० | २१ |
| १४ | क-२२/५ | राष्ट्रीय विजेता योजना | ० | ५०००००० | ५०००००० | २२ |
| १५ | क-२९/५ | वृक्ष गणना करणे | ५००००० | ५०००००० | ४५००००० | २६ |
| १६ | क-२९/६ | नविन झाडे लावणे | ५००००० | ५०००००० | ४५००००० | २६ |
| १७ | क-२९/८ | ट्रि गार्ड | ६००००० | २६००००० | २०००००० | २६ |
| १८ | क-२९/९ | झाडे देखभाल | ५००००० | ५०००००० | ४५००००० | २६ |
| १९ | ड-२/२ | क्रिडा स्पर्धा योग प्रशिक्षण अनुदान | १००००० | ५००००० | ४००००० | ३० |
| २० | ड-१४ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (रस्ते प्रकल्प) | ० | १००००००००० | १००००००००० | ६७ |
| २१ | ड-१९ | आर्किटेक फी | ० | १०००००० | १०००००० | ३४ |
| | | **भाग - २ भांडवली खर्च** | | | | |
| २२ | भाग-२/१ | नविन गटारी | २०००००० | १४०००००० | १२०००००० | ३७ |
| २३ | भाग-२/४ | नविन इमारती / फायर स्टेशन बांधने व वार्ड आफीस बांधणे | १५००००० | २५१५००००० | २५०००००० | ३७ |
| २४ | भाग -२/२५ | उड्डानपुल भुयारी मार्ग | ७००००००० | १००००००० | ३०००००० | |
| २५ | भाग-२/५ | नविन रस्ते | १५०००००० | ७०००००००० | ५५००००००० | ३८ |
| २६ | भाग २/८ | नविन वाहन फायर / आरोग्य /इतर वाहन खरेदी | २५०००००० | ७५०००००० | ५०००००० | ३८ |
| २७ | भाग -२/२० | रेडक्रॉस मागील जागा विकसीत करणे (प्रस्तावीत हेड) | ० | २०००००० | २०००००० | ३९ |
| २८ | पा.पु. क-१/१४ | पाणीपुरवठा व्यवस्था दुरुस्ती | १०००००० | ३०००००० | २०००००० | ४५ |
| | | एकुण :- | ३६५१००००० | २८११७००००० | २४४६६००००० | |

**मा.सभापती:-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.
राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

Corporation of the City of Jalgaon
जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

(सही)
सभापती
स्थायी समिती
जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

सदरील सभेचे कार्यवृत्त ठराव क्रमांक २९५ दि.२२/०५/२०२० रोजी मंजुर करण्यात आलेले आहे.

(सही)
सभापती
स्थायी समिती.